दूर ठेवावे लागते.'' हे शब्द ऐकताच माझ्या मनातील किल्मिष साफ झाले. बाबांच्या माझ्यावर असलेल्या अथांग प्रेमाच्या लाटेत बुडून जात असतानाच अंतरात्म्यास खात्री पटली की हाच माझा तारणहार गुरुदेव सरते शेवटी मला मिळाला.

यानंतर बाबांनी मला ''आई''कडे (जिला बाबा ''रामकृष्णी'' म्हणत असत.) मुक्कामास पाठविले. तेव्हापासून आईच्या निधनापर्यंत शिरडीतील माझ्या वास्तव्यात त्यांच्याकडेच मी राहत असे.

आई ह्या अतिशय विशाल हृदयी व प्रेमळ बाई होत्या. खरोखरच त्या सर्वांच्या आई होत्या. सुरुवातीपासूनच मी त्यांना आई मानले. त्यांनी मला लेक मानले. बाबा रोज त्यांना भिक्षेतील एक भाकरी व थोडी भाजी पाठवित असत.

मी तेथे असलो म्हणजे अधिक भाजी, भाकरी पाठवित असत. काही वेळेस ते आईला जास्त प्रसाद पाठवित. त्याचे कारण मी त्या दिवशी पोचणार हे असे.

आईची बाबांवर निस्सीम भक्ती होती. त्यांचे जीवन सर्वस्वी बाबांना वाहिलेले होते. बाबांची आज्ञा तंतोतंत पाळून साईसंस्थानला जे जे लागेल ते ते जिवापाड प्रयत्नाने त्या मिळवित असत. मला वाटते बाबांच्या सूचना व प्रेरणा आई ह्या माध्यमाकरवी माझ्यापर्यंत येत असत. त्या दयाळू व मोकळ्या मनाच्या असल्याने माझे सर्व विचार मी नि:संकोचपणे त्यांच्यासमोर मांडीत असे आणि त्यासुद्धा तितक्याच मोकळ्या मनाने त्यांचे विचार मला सांगत असत. आध्यात्मिक प्रगतिबद्दल त्यांचे असे म्हणणे असे की आपण करीत असलेली साधना व आपली त्यातील प्रगती याचा कोणाला पत्ता लागू देऊ नये. या बाबतीत संपूर्ण गुप्तता बाळगावी असे बाबा नेहमी म्हणत. (जिन्ने कमाया उन्ने छुपाया) आई ह्या एका मधुर आवाजाची देणगी व संगीताचे ज्ञान लाभलेल्या गायिका होत्या. मीही संगीतवेडा असल्याने त्यांच्या भजनात पूर्णपणे रंगून जात असे. एके दिवशी आपली आध्यात्मिक साधना कशा रीतीने करावी या संबंधी आम्ही बोलत असताना त्या म्हणाल्या, ''भजनात किंवा अभंगात रंगणे हे जरी उपयुक्त असले, तरी त्यामुळे इतरेजनांचे आपल्याकडे जास्त लक्ष जाते. आपल्या प्रगतीसाठी ते पुरे पडत नाही. म्हणून नाम जप हेच आपल्यासाठी योग्य आहे.'' यावर आम्ही सहमत झालो. आई म्हणाल्या, ''पुष्कळ लोक विठ्ठल, राम, शिव इत्यादी नामजप करतात पण माझ्यापुरते म्हणाल तर साई हाच माझा ईश्वर आहे आणि साई हे नामच माझ्या दृष्टीने पुरे आहे. तुम्हाला दुसरे नाम आवडत असेल तर त्याचा जप तुम्ही करा.'' मी म्हणालो, ''मी विठ्ठल किंवा राम पाहिला नाही. जे तुमचे इष्ट दैवत आहे तेच माझेही असल्याने त्याच नामाचा जप मी करीत

जाईन.'' नंतर आम्ही एकमेकासमोर बसून सुमारे तासभर रंगून गेलो. त्या दिवशी बाबांनी मला बोलावून घेतले. सकाळी मी काय करीत होतो असे मला विचारले. मी म्हणालो, ''नामजप''. बाबांनी विचारले, ''कोणता नामजप?'' मी उत्तरलो, ''माझ्या इष्टदेवतेचा''. बाबा म्हणाले, ''तुझी इष्टदेवता कोणती?'' मी म्हणालो, ''तुम्ही जाणताच''. स्मित करून बाबा म्हणाले, ''योग्य तेच बोललास''. याप्रमाणे याच नामजपावर बाबांनी आपल्या पसंतीचे शिक्कामोर्तब केले. कारण आई व मी या दोघांचीही नकळत ही प्रक्रीया त्यांनी चालू करून दिली.

ही साधना सुरु करून देण्यात बाबांना कोणते साध्य अभिप्रेत होते असा प्रश्न एखाद्याच्या मनात उभा राहील, ते साध्यही बाबांच्या पद्धतीप्रमाणे आकर्षकरीत्या प्रगट झाले, ते म्हणजे निस्सीम प्रेमाने परमेश्वराप्रत पोचणे व गुरूरूपात त्याला पाहणे. याच मार्गाने आमची वाटचाल सुरू झाली. काही लोकांना इष्टदेवतेचा साक्षात्कार होत असे पण मी त्याला फारसे महत्त्व दिले नाही. मी बाबांपेक्षा निराळा आहे ही भावनाच मला नको होती. मी त्यांची प्रार्थना केली की ते व मी एकरूप होऊन त्यांनी मला अंतर्बाह्य व्यापून टाकावे. मी गीता वगैरे ग्रंथांचे वाचन आजपावेतो केले नाही. म्हणून ध्यानाचा परमोच्च बिंदू कोणता या व असल्या चर्चेत मी पडू इच्छित नाही.

एका गुरुपौर्णिमेला बाबांच्या दर्शनासाठी बरीच भक्तमंडळी आली होती. त्यांनी नेहमीप्रमाणे एक ग्रंथ आणला होता. प्रत्येकाला वाटे की तो ग्रंथ बाबांच्या हातून प्रसाद म्हणून आपणास मिळावा. पण बाबा असा ग्रंथ ज्याचा त्याला न देता दुसऱ्या कोणालाही तो देऊन टाकीत. त्या वेळी मी सोडून प्रत्येक भक्ताच्या हाती एक एक ग्रंथ होता. तेव्हा बाबा माझ्याकडे बघून म्हणाले, ''या सर्वांना या ग्रंथात ब्रह्म शोधायचे आहे. पण त्या ग्रंथात ब्रह्म नसून भ्रम आहे. तू पुस्तके वाचू नकोस. मला तुझ्या हृदयात बसव. बुद्धी व हृदय या दोघांचे ऐक्य झाले तरी पुरे.'' म्हणून मी धार्मिक ग्रंथाच्या वाटेसही गेलो नाही. माझ्यापरीने जे मला मिळाले आहे त्यात मी पूर्ण समाधानी आहे. कधी कधी मला वाटे की माझी बाबांवरील भक्ती दृढ असली तरी त्यांची सेवा त्या मानाने मला फारच कमी घडते.

सन १९१२च्या गुरुपौर्णिमेस मी शिरडीस जात असताना मनमाड स्टेशवर बरेच भक्त दिसले. त्यापैकी प्रत्येकाजवळ चांगला हार व इतर पूजा साहित्य होते. ते पाहून आपल्या गुरुदेवाकडे जाताना आपल्याजवळ काहीच नाही हा विचार मनात येऊन मी कष्टी झालो. आम्ही सर्व शिरडीस पोहचल्यावर मशिदीत गेलो. दर्शन घेतले. तेव्हा बाबांच्या गळ्यात बरेच हार घातलेले पाहून मी शरमिंदा झालो. लगेच बाबांनी

तिथल्या हारांचा ढीग उचलला व मला म्हणाले, ''हे सर्व हार तुझे आहेत.'' किती कनवाळू आहे माझी गुरुमाय! या दीनावर केवढी माया!

त्याच वर्षी मी शिरडीस जाताना बरोबर शंभर रूपये घेतले होते. बाबांनी प्रथम माझ्याकडून ४० रुपयांची दक्षिणा मागितली. मी लगेच दिली. थोड्या वेळाने पुन्हा ४० रुपये मागितले. तेही मी आनंदाने दिले. शेवटी उरलेले वीस रुपयेही मागून घेतले. त्यामुळे खिशात दिडकी उरली नाही. तरी माझ्या मनाला यत्किंचितही खेद झाला नाही. थोड्या वेळाने बाबांनी आणखी दक्षिणा मागितली. मी म्हणालो, ''माझ्या जवळ काही उरले नाही.'' यावर ''दुसऱ्याकोणाकडून मागून आणून दे'', असे बाबा म्हणाले. मी म्हणालो, ''कोणाकडून मागून आणू ते सांगा.'' त्यावर बाबा म्हणाले, ''शाम्याकडून मागून आण.'' मी माधवराव देशपांडे यांच्याकडे जाऊन बाबांचा निरोप सांगितला. त्यावर ते म्हणाले, ''बाबांनी दक्षिणा मागितली याचे मर्म तुमच्या लक्षात आले नाही. कोणीही दिलेला शब्द बाबांना कवडी समान आहे. त्यांना तुमची दक्षिणा म्हणजे मन, बुद्धि व ज्ञान असे तुमचे सर्वस्व हवे आहे''. मी बाबांकडे जाऊन माधवराव काय म्हणाले ते सांगितले. यावर बाबांनी हसून मला ''काकासाहेब दीक्षितांकडे जा'', असे सांगितले. मी काकासाहेबांकडे जाऊन बाबांचा निरोप सांगितला. ते म्हणाले, ''तुम्हाला माझ्याकडे पाठविण्यात बाबांचा हेतू असा की तुम्हाला पैसे संपल्याबद्दल किंवा संपले असताना दुसऱ्याजवळ मागण्यात कोणताही कमीपणा वाटू नये.'' मी पुन्हा बाबांकडे जाऊन दीक्षितांचे म्हणणे त्यांना सांगितले. ते पुन्हा स्मित करून म्हणाले, ''आता नानाकडे जा.'' त्या वेळेस नानासाहेब चांदोरकर खंडोबाच्या देवळात उपासनींबरोबर अध्यात्मावर चर्चा करीत होते. माझी मागणी ऐकल्यावर मला ते व्यवहार शिकवू लागले. ते म्हणाले, ''बाबांनी दक्षिणा मागावी आणि ती देण्यास आपल्याजवळ काहीच नसले म्हणजे अगदी नाजूक परिस्थिती होते. अशा पेचात सापडू नये म्हणून माझी पद्धत अशी आहे. शिरडीस निघताना मी ठराविक रक्कम घेतो. त्यातील निम्मी कोपरगावला ठेवतो. या वेळी मी २०० रुपये घेऊन निघालो व त्यातले १०० रुपये कोपरगावी ठेऊन १०० रुपये घेऊन येथे आलो. बाबांनी दक्षिणा मागितली असताना नाही म्हणण्यास फार खेद वाटतो. तेव्हा मी प्रथम माझ्या जवळचे पैसे दक्षिणा देऊन संपले की उरलेली रक्कम कोपरगावहून मागावून घेतो. तुम्ही यापुढे असेच करा.'' हे मी बाबांना सांगितले. तेव्हा बाबांनी मला तेथेच बसावयास सांगून ४० रुपये दक्षिणेकरिता नानासाहेबांकडे निरोप पाठविला. त्याप्रमाणे नानासाहेब आले व त्यांनी दक्षिणा दिली.

बाबांनी वरच्यावर दक्षिणा मागून नानासाहेबांची शिल्लक संपविली व

नानासाहेबांना कोपरगावी निरोप पाठवावा लागला. पण तिकडून रक्कम येण्याच्या आत बाबांनी पुन्हा दक्षिणा मागितली. यामुळे नानासाहेबांना फारच संकोचल्यासारखे झाले. यावरून बाबांना आम्हा सर्वांना एवढाच धडा शिकवायचा होता की बाबांच्या गरजा आपण पुरवितो हा अहंकार कोणास होऊ नये. याबरोबर बाबांनी मला हे ही दाखविले की, दक्षिणा मागितली याचा अर्थ निरनिराळ्या व्यक्तींकडून आपआपल्या बुद्धिप्रमाणे वेगवेगळा अर्थ लावला गेला. वास्तविक बाबांना पैसा क:पदार्थ होता. त्यांना एकच पाहिजे होते ते आम्हा सर्वांचे शुद्ध प्रेम. आणि नेमके हेच त्यांना देण्याचा माझा निर्धार होता. ही माझ्या अंतर्मनाची इच्छा ते जाणून होते. आणि त्यांच्या अलौकिक शैलीने त्याचा प्रतिसाद मला मिळत असे. १९१५ सालची रामनवमी असेल. मी इंदौरच्या बाजारात जाऊन बाबांसाठी एक अतिशय तलम जरीचे वस्त्र आणले. त्याची किंमत ८५ रुपये होती. तलम असल्याने त्याची घडी करून माझ्या सदऱ्याच्या आतील खिशात ठेवली. भक्तमंडळी या उत्सवात वस्त्रे बाबांना देऊन त्यांच्याकडून प्रसाद म्हणून परत घेत असत. पण मी मात्र मनोमन असे ठरविले होते की माझे विशुद्ध प्रेम बाबा जाणत असतील तर ते वस्त्र मला परत न देता ठेऊन घेतील व परिधानही करतील. प्रत्येक भक्त आपआपले वस्त्र बाबांच्या चरणी अर्पण करीत असे. सरते शेवटी तेथील सेवक प्रत्येकाला पुकारून ज्याचे असेल त्याला परत करीत असत. यातून सुटण्याकरिता मी अशी युक्ती योजिली की जेव्हा बाबांचे चरण वंदन केले तेव्हा त्या वस्त्राची घडी हळूच बाबांच्या गादीखाली सरकविली. त्यानंतर बाबा गादीवरून उठले व त्यांनी गादी झटकविण्यास सेवकांस सांगितले. गादी उचलल्यावर त्या खाली माझ्या वस्त्राची घडी होती. ती त्यांनी उचलून उघडली व म्हणाले, ''हे काय आहे? तलम उपरणे? हे मी परत करणार नाही. हे माझे आहे.'' मग ते अंगावर पांघरून मला म्हणाले, ''उपरण्याचे पांघरूण छान दिसते नाही का रे?'' माझ्या इच्छापूर्तीचे समाधान मला मिळाले. ते व मी एकच असल्याची नि:संदेह ग्वाही मिळाली.

त्याच वर्षी ते व मी एकरूप झालो आहोत याची खूण मला दुसऱ्या रीतीने मिळाली. मी शिरडीस जाऊन नेहमीप्रमाणे आईकडे राहात होतो. एके दिवशी दुपारी बाबा एकटेच असताना त्यांनी एकाबरोबर निरोप पाठवून मला बोलावून घेतले. मी जाऊन चरण वंदून बसलो. ह्या दुसऱ्या माणसास त्यांनी बाहेर जाण्यास सांगितले. तो गेल्यावर मला जवळ घेऊन दृढालिंगन दिले व म्हणाले, ''माझ्या खजिन्याची चावी तुझ्या हातात दिली आहे. तुला जे पाहिजे ते माग, मी देईन.'' ही माझी कसोटी आहे, हे ओळखून मी म्हणालो, ''बाबा मला काही नको.'' हे ऐकल्यावर बाबांनी माझी हनुवटी धरून कुरवाळून मला विचारले, ''अरे, असे काय करतोस, काही तरी माग.'' यावर मी म्हणालो, ''मी काहीही मागितले तरी ते देण्यास तुम्ही

तयार आहात ना?'' बाबा म्हणाले, ''तू वाटेल ते माग.'' मग मी म्हणालो, ''मला असे पाहिजे की या जन्मी व येणाऱ्या पुढील जन्मातही तुमची माझी ताटातूट होऊ नये. तुम्ही निरंतर माझ्या जवळच असले पाहिजे.'' यावर अत्यंत समाधानाने त्यांनी मला थोपटले व म्हणाले, ''होय, तू कोठेही असलास, काहीही केलेस तरी तुझ्या बरोबर मी तुला अंतर्बाह्य व्यापून राहीन.'' हे ऐकून मला अत्यंत समाधान झाले. ते नेहमी माझ्या जवळच आहेत अशी माझी धारणा आहे. काही वेळा ते साक्षात प्रगट होऊन माझे समाधान व मार्गदर्शन करतात.

यानंतर बऱ्याच वर्षांनी माझ्या अपत्याचे निधन झाले. त्यामुळे माझी पत्नी दुःखाने रडू लागली. मी तिची समजुत घातली की बाबा ज्यात आपले हित आहे तेच करतात. तू रडू नकोस. विश्रांती घे. असे सांगून ते मृत बालक मांडीवर घेऊन बसलो असताना बाबा प्रगट होऊन म्हणाले, ''तुला मी पाहिजे की मृत बालक? यातून एक मिळेल दोन्ही मिळणार नाहीत. बालकास मी जिवंत करावे असे तुला वाटत असेल तर मी ते करीन पण मग मी तुला दुरावेन. बालक नको असेल तर योग्य वेळी तुला भरपूर संतती होईल.'' मी लगेच जबाब दिला, ''मला तुम्ही हवे.'' ''मग वृथा शोक करू नकोस.'' इतके बोलून बाबा अंतर्धान पावले. अशा तऱ्हेने प्रसंगानुरूप ते प्रगट होऊन माझे समाधान करतात. त्यांच्या कृपेने माझ्या सर्व गरजा भागतात. माझ्या ऐहिक अडचणी दूर करा असे मी कधीच मागत नाही. माझे मासिक उत्पन्न, विमा आणि स्थावर यावर मी पूर्ण समाधानी आहे. काही गरज पडली तर बाबांच्या कृपेने ती भागविली जाते. आजपर्यंत मला कुरकुरण्याचे कारण कधी पडले नाही.

ज्या कोणाला बाबांचे प्रत्यक्ष दर्शन होऊ शकले नाही अशा एखाद्याने बाबांची भक्ती करून त्यांचे सहाय्य कसे मिळवावे अशी विचारणा केल्यास माझे उत्तर असे आहे. एके ठिकाणी बसून तुम्ही तुमचे सर्वस्व ओतून बाबांची प्रार्थना करा. शिरडीस जाणे यासाठी पोषक ठरत असले तरी शिरडीस गेलेच पाहिजे असे नाही. ज्या क्षणी तुमच्या विशुद्ध प्रेमाचा प्रवाह बाबांपर्यंत पोचेल त्या क्षणी तुम्ही बाबांचे होऊन जाल व तुमच्या योग्यतेप्रमाणे तुम्हास फळ मिळेल. बाबा सर्वांसाठी एकच एक साधनेचा मार्ग दाखवित नाहीत. प्रत्येक साधकाची पायरी, आणि परिस्थितीनुरूप असलेली त्याच्या मनाची घडणही लक्षात घेऊन त्याला मार्गदर्शन करतात. प्रत्येकाने आपआपल्या इष्टदेवतेचीच उपासना करावी असे त्याचे सांगणे असे.


कधी कधी आणलेल्या नैवेद्यावर ते स्वत: फातिया म्हणत किंवा कोणाकडून म्हणवून घेत. हिंदू व मुसलमान आपआपल्या धर्मानुसार त्यांची भक्ती करीत असतात.

सन १९१६ च्या सुमारास दोन रोहिले शिरडीस येऊन बाबांच्या भक्तीत रमले. त्यातील वयाने वडील असलेला रोहिला नेहमी बाबांजवळ असे आणि दररोज रात्री बाबांच्या चरणाजवळ बसून कुराण पठण करी. तो बाबांना पैगंबर मानून त्यांच्याविषयी अतिशय पूज्यभाव दर्शवित असे. तरीही बाबा आपली पूजा करू देतात, आरती करू देतात, देवाचा नैवेद्य ग्रहण करतात या गोष्टी पाखंडीपणाच्या आहेत व म्हणून निषिद्ध आहेत असे तो सांगे. अशा धर्मबाह्य गोष्टी तुम्ही का चालू देता असे त्यांनी बाबांस विचारले. बाबा हसून त्याला म्हणाले, ''हे सर्व अल्लाचे खेळ आहेत. आपण सर्व अल्लाची लेकरें आहोत.'' कधी लहरीत येऊन ''मी ईश्वर आहे'' असेही उद्‌गार ते काढीत. हे सर्व त्या रोहिल्याला सहन न होऊन तो म्हणाला की, ''बाबा पैगंबर असले तरी त्यांची पाखंडी वर्तणूक चुकीची व धर्मबाह्य आहे. म्हणून मी बाबांचा व त्याच्या पाखंडीपणाचा निःपात करीन.'' असा निर्धार करून तो एके दिवशी बाबा बाहेर चालले असताना त्यांना मारण्याच्या तयारीने सोटा घेऊन त्यांच्या मागे गेला. बाबांनी मागे फिरून त्याचे मनगट धरले व एक भेदक दृष्टीक्षेप त्याच्याकडे टाकल्याबरोबर तो रोहिला गर्भगळीत होऊन तेथेच कोसळला व त्याला उठताही येईना. मग लोकांनी त्याला उठविले. थोड्याच दिवसांत तो कायमचा शिरडी सोडून गेला. दुसरा रोहिला इतका कडवा नव्हता. तो संस्थानातच बारीक सारीक काम करून राहात असे. मुसलमान भक्ताप्रमाणे काही हिंदु भक्तही तितकेच कडवे होते. पण बाबांनी कोणाचाच धर्मवेडेपणा, कडवेपणा चालू दिला नाही. मला आलेले सर्वच बाबांचे अनुभव सांगणे शक्य नाही व ते इष्टही नाही. त्यांच्या मजवरील प्रेमाला सीमाच नव्हती. भक्तांना मदत करण्याची त्यांची पद्धत त्या त्या भक्ताची मनोवृत्ती व प्रसंगानुरूप वेगवेगळी असे. माझ्या मते खालीलप्रमाणे त्यांचे मार्गदर्शन भक्तांना मिळत असे. आपण जर संकटात असू किंवा बाबांना आपण एका विशिष्ट मार्गाने जावे असे वाटत असेल तर आपणास मनात एखादी उत्स्फूर्त कल्पना येऊन त्यानुसार वागावे अशी प्रेरणा होत असे. त्याचबरोबर ही प्रेरणा बाबांकडून आली आहे याची जाणीव पण होत असे. हा एक मार्ग झाला. दुसरा मार्ग स्वप्नात दृष्टांतरूपाने किंवा जरूर पडल्यास प्रत्यक्ष प्रगट होऊन भक्तांना सूचना देणे. अर्थात हा सर्वात परिणामकारक मार्ग होता. तिसरा मार्ग हा की बाबा आपणास दुसऱ्या कोणाकडे जावयाची प्रेरणा देतात. पुष्कळवेळा अशी व्यक्ती आपणास मार्गदर्शन कशी करू शकेल याबद्दल आपल्या मनात संशय असतो. तरी पण अशा व्यक्तीच्या तोंडून उत्स्फूर्तपणे निघालेल्या उद्‌गारामुळे आपल्या प्रश्नाचे उत्तर आपणास मिळते. वरील तिन्ही मार्गांनी बाबांनी माझ्यासमोरील समस्यांचा परिहार केलेला आहे.

मी, साईबाबा व रामकृष्ण परमहंस या विभूती एकच आहेत असे मानतो.

कारण नुकताच तसा अनुभव मला मिळाला. सुमारे आठ वर्षांपूर्वी मी कलकत्त्याहून दक्षिणेश्वरला गेलो होतो. तेथील एका संस्थानिक माणसास घेऊन मी त्या परिसरातील सर्व स्थाने पाहिली. त्याने मला प्रथम काली मंदिरात नेऊन दर्शन घडविले. पण श्री रामकृष्ण नेहमी क्रीडा करीत असलेल्या रामलालाची मूर्ती पहाण्यास फार उत्सुक होतो. त्याने मला दुसऱ्या मंदिरात नेऊन एक भव्य मूर्ती दाखविली व हाच रामलाल आहे असे सांगितले. पण रामलालची ही मूर्ती असणे शक्य नाही असे म्हणताच तो म्हणाला, ''मी येथलाच स्थानिक आहे. तुमच्यापेक्षा मला जास्त माहिती आहे.'' पण मी रामकृष्णांचे चरित्र वाचलेले असल्याने रामलालची वाचलेली माहिती व मला दाखविलेली मूर्ती यात फारच तफावत होती. त्याच वेळी मंदिराचा पुजारी येऊन "दक्षिणेकडून कोण आले आहे'', असे विचारू लागला. मी ''दक्षिणेकडून आलो आहे'', असे म्हणालो. त्यावर ''माझ्याबरोबर चला, मी सर्व देवांचे यथासांग दर्शन करून देतो''; असे तो म्हणाला. ''आत्ताच दर्शन घेऊन आलो'', असे त्याला सांगितले तरी तो ऐकेना. कारण आदल्या रात्री स्वप्नात त्याला अशी सूचना मिळाली होती की, सकाळी दक्षिणेतून एक भक्त येणार आहे, त्याला सर्व दैवतांचे दर्शन घडव. हे ऐकल्यावर मी पुन्हा दर्शन घेण्यास तयार झालो. काली मंदिराच्या गाभाऱ्यात घेऊन जाऊन मूर्तीला स्पर्श करून पूजा करण्यास त्यांनी सांगितले. नंतर, ''चला मी तुम्हाला रामलाल दाखवितो'', असे तो म्हणाला. ''रामलालची मूर्ती मी पाहिली आहे'', असे त्याला मी सांगितले. यावर त्याने त्या स्थानिक इसमाची मला फसविल्याबद्दल हजेरी घेतली आणि रामलालची चिमुकली मूर्ती काढून माझे मांडीवर ठेवली. याच मूर्तीबरोबर रामकृष्ण नेहमी क्रीडा करीत असत. या रीतीने रामकृष्णरूपी साईने माझी अपेक्षा पुरी केली. काही तत्कालीन संतांनी साईबाबांची कृपा असलेला एक प्रेमळ भक्त मी आहे हे ओळखून त्याची जाणीव मला करून दिलेली आहे. नुकतेच ब्रह्मीभूत झालेले व वरच्यावर पुण्यात राहणारे माधवनाथ महाराज यांचे दर्शन मला १९२७ साली प्रथम झाले. मी कोण हे महाराजांना कोणी न सांगताही साईबाबांशी माझा संबंध आहे हे जाणून ''तुम्ही बाबांचे आहात,'' असे उद्‌गार काढले. बाबांच्या प्रथम भेटीत काय घडले ते त्यांनी मला सांगितले. बाबांचे तंतोतंत उद्‌गारही मला ऐकविले. ते म्हणाले, ''मी त्यावेळेस हजर होतो (अदृश्य रूपात)''

(क्रमशः)



# ग्रीष्मऋतु-आहार विहार

- वैद्य किरण पां. भावे,
आयुर्वेदाचार्य, मुंबई.

मागील लेखामध्ये आपण ऋतुचक्र, ऋतुबदल व त्याचे हवामान निसर्गावर होणारे परिणाम व त्यानुसार मनुष्याच्या शरीरात होणारे बदल थोडक्यात पाहून नंतर वसंतऋतुमध्ये होणारे रोग व ते टाळण्यासाठी मनुष्याने आहार विहारात काय बदल करावेत ते पाहिले.

वसंतऋतुनंतर ग्रीष्मऋतु येतो. त्यामध्ये आता कोणते रोग होऊ शकतात व त्यासाठी आहार विहार काय असावा ते आपण पाहू.

ज्येष्ठ व आषाढ महिन्यात ग्रीष्मऋतु येतो. ह्या दिवसांत सूर्य व सूर्यकिरणांची उष्णता प्रखर असते. त्यामुळे पृथ्वीवरील प्राणीमात्रांच्या रसाचे शोषण होत असते.

कफाचे प्रमाण कमी होत जाते व वायुचे प्रमाण वाढत जाते, म्हणजेच वायुचा संचय होऊ लागतो व तो पुढील म्हणजे वर्षाऋतुमध्ये त्रासदायक ठरू शकतो.

ह्यासाठी खारट, कडू व आंबट पदार्थ वर्ज्य करावेत. मधुर हलके स्निग्ध, थंड व पातळ असे अन्न खावे. भात, दूध, तूप यांचे सेवन करावे. पातळ मांसरस, साखर घालून थंड केलेली सरबते, किंवा खीर, लापशी इ. घ्यावे.

मद्यप्राशन टाळावे. त्यामुळे सूज, शैथिल्य, दाह इ. विकार होऊ शकतात.

श्रीखंड, द्राक्ष, खजूर, मडक्यातील पाणी, पन्हे, केळी, चिंच, खोबरे, गरे इ. चे केलेले सरबत प्यावे. पिण्यासाठी चंदन वाळा, कापूरयुक्त सुगंधी पाणी वापरावे. शेवया, थंड दूध ह्यांचा उपयोग करावा.

व्यायाम, उन्हात फिरणे वर्ज्य करावे. थंड पाण्याने स्नान करावे, स्नानाचे पाणी पण सुगंधी असावे. दुपारी स्वस्थपणे शय्येवर पडून राहावे. चंदन इ. चा लेप शरीराला लावावा. थंड हवेच्या ठिकाणी राहाण्यास जावे. ज्या ठिकाणी वृक्षवेली, झाडे आहेत, कमलपुष्पे, सुगंधी फुले आहेत अशा ठिकाणी वेळ घालवावा. ह्या दिवसांत ते सर्वांना अशक्य आहे. तरी पण सुट्टी घेऊन थंड हवेच्या ठिकाणी जावे. दुपारचे फिरणे शक्यतो टाळावे. शक्य असेल तर थंड दूध, रस, सरबते इ. चे सेवन करावे. सध्याच्या काळाप्रमाणे एअर-कंडिशन्ड खोलीत थोडावेळ घालवण्यास हरकत नाही. विशेषत: दुपारच्या वेळी फार गरम होत असते तेव्हा, किंवा फिरताना टोपी, उन्हाचा चष्मा

वापर करावा. रात्री उघडच्या व थंड ठिकाणी चंद्रप्रकाशात झोप घ्यावी. वाळ्याचे लावावे. सुती हलकी, पातळ वस्त्रे धारण करावीत. म्हणजे सध्याचे टेरीकॉट, पॉलीस्टर टाळावे. कॉटनचे मलमलचे कपडे घालावेत. कपडे फार घट्ट असू नयेत.

अशा तऱ्हेने आहार विहार ठेवल्याने कमी झालेला कफ योग्य प्रमाणात होऊन वायुचा होणारा संचय कमी होऊन पुढील वर्षाऋतुत होणारा त्रास कमी होईल. मनुष्याचे बल क्षीण होणार नाही.

ह्या दिवसांत विशेषतः वायुसंचयामुळे पोट फुगणे, अनुत्साह, मळमळ, भूक कमी लागणे, हातपाय, सर्व शरीर दुखणे, संडासच्या तक्रारी, तहान जास्त लागणे, चक्कर येणे, डोके दुखणे, जड होणे इ. विकार होऊ शकतात.

अग्नीमांद्य असल्याने जुलाब, किंवा अपचन होते व त्यामुळे अस्वस्थता निर्माण होते. मनुष्यबळ कमी होत असते. त्यामुळेच सर्दी, ताप, खोकला पण होऊ शकतो.

त्यासाठी वरीलप्रमाणे आहार विहार ठेवावा. म्हणजे मनुष्य निरोगी राहील व पुढील वर्षाऋतुमध्ये होणारे रोग पण टाळता येतील किंवा त्याचा जोर कमी करता येईल आणि शरीर व बलहानी टळेल.

---

**तराजूचें पारडे वजन जास्त असेल त्या बाजूला झुकते व जी बाजू हलकी असेल ती वर जाते. मनुष्याचे मनही तराजूच्या दांडीप्रमाणे असते. त्यात एका बाजूला संसार आणि दुसऱ्या बाजूला ईश्वर असतो. ज्याच्या मनावर संसार, मानमरातब, वगैरेंचा भार अधिक असतो, त्याचे मन ईश्वरावरून निघून संसाराकडे जास्त झुकते आणि ज्याच्या मनात विवेक, वैराग्य आणि भगवद्भक्ती अधिक असते त्याचे मन संसारातून निघून ईश्वराकडे झुकते.**

**- श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**



# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय ६ वा

## उत्तरार्ध

**सटीक गद्य अनुवाद:**
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त),
बंड गार्डन रोड, पुणे.

**(मागील अंकावरुन पुढे चालू)**

पुढे या उरूसापोटी रामनवमीचा उत्सव कसा उद्भवला ते आश्चर्यकारक (अभिनव) कथानक (आता) ऐका. हा रामनवमीचा उत्सव म्हणजे शिरडी गावाचा आत्मानंद देणारा (गौरव) मानसन्मान आहे. शके १८३३ (सन १९११) साली रामनवमी प्रथम आली आणि उरूसापोटी जन्माला आली आणि तेव्हापासून अखंड (अव्याहत) चालत आहे. प्रसिद्ध कै. कृष्ण जागेश्वर भीष्म (श्रीसाईनाथ सगुणोपासना या आरतीच्या पुस्तिकेचे कर्ते) यांचेपासून या (उत्सवाच्या) कल्पनेचा उगम झाला. त्यांना वाटले रामजन्म उत्सवाचा आरंभ (उपक्रम) करावा. सर्वांना फार हितकारक होईल. तेथपर्यंत केवळ उरूस यात्राच पुष्कळ प्रमाणात (बहुवस) भरत असे. त्यातूनच हा (राम) जन्माचा गोड उत्सव त्या साली उदयास आला. एकदा भीष्म (साठ्यांचे) वाड्यात स्वस्थ चित्ताने बसले असता काका (कै. लक्ष्मण गणेश उर्फ काका महाजनी) पूजासाहित्यासह (पूजा संभारसमवेत) मशिदीत जाण्याला तयार (उद्युक्त) झाले. मनात साईदर्शनाचा हेतू (काज) परंतु त्यांवर उरूसाचीही मौज म्हणून काका उत्सवासाठी आधीच एक दिवस शिरडीत हजर झाले होते. योग्य वेळ पाहून भीष्मांनी काकांना विचारले, "माझ्या मनात एक चांगला विचार (सद्+वृत्ति) आला आहे. मला मदत कराल का? येथे दरवर्षी उरूस भरत असतो. रामजन्माचा हा दिवस आहे. तेव्हा (रामाचा) जन्मोत्सव संपादण्याची ही संधी अनायासे आलेली आहे. (मला वाटते त्याचा उपयोग आपण करून घ्यावा.)" काका महाजनींना हा विचार आवडला (व ते म्हणाले), "घ्या बाबांचा होकार. त्यांच्या आज्ञेवर सर्व काही आहे. कामाला मग उशीर नाही." परंतु उत्सवाला कीर्तनाची जरूरी असते. तो प्रश्न उभा राहिला. खेडेगावी हरदास (कीर्तनकार) कोठला सापडायचा? ही एक अडचण उभी राहिली. भीष्म म्हणाले, "मी कीर्तनकार. तुम्ही पेटीचा (हार्मोनियमचा) सूर धरा (वाजवून साथ द्या). राधाकृष्णाबाई (मूळचे नाव सुंदराबाई क्षीरसागर. परंतु त्या कोणाही माणसाला हाक मारताना 'राधाकृष्णा' म्हणून हाक मारत म्हणून 'राधाकृष्णाबाई' हे नाव पडले. त्या बालविधवा होत्या व शिरडीत राहून पडेल ती संतसेवा करत व नेहमी भजन करत असत.) वेळेवर सुंठवडा (देवाच्या जन्मोत्सवाच्या शेवटी

करण्यासाठी केलेले सुंठ, गूळ किंवा साखर इ. पदार्थ मिश्रण) तयार करतील. चला मग बाबांकडे. शुभकार्याला विलंब लावला की काहीतरी अडचण (सांकडे) उभी राहते. शुभकार्याला शीघ्रत्वाची (तत्परतेची) जोड दिली की ते हातोहात (रोकडे) सिद्ध झाले जाते. चला आता कीर्तन करावयाची आज्ञा घेण्यास आपण जाऊ या.'' असे बोलून ते दोघे लगेच त्यावेळी मशिदीत येऊन पोहोचले. काकांनी पूजेला आरंभ करताच बाबांनीच प्रश्न केला की वाड्यात काय चालले होते? (पण) काकांना (रामजन्मोत्सवाबद्दल) विचारणे सुचले नाही. तेव्हा लगेच (तात्काळ) बाबांनी तोच प्रश्न दुसऱ्या तऱ्हेने भीष्मांना विचारला, ''का हो! बुवा (काका महाजनी) काय म्हणत होते?'' तेव्हा काकांना आठवण झाली आणि त्यांनी मनात योजिलेला हेतू (उद्दिष्ट+अर्थ) सांगितला. बाबांच्या मनाला तो विचार आवडला आणि उत्सव करण्याचे निश्चित केले. दुसऱ्या दिवशी सकाळी बाबा लेंडीला (लेंडीबाग. समाधिमंदिराच्या पश्चिमेस व अहमदनगर-मनमाड हमरस्त्याला लागून असलेली ही बाग बाबांचे भक्त कै. रा. ब. मोरेश्वर प्रधान यांनी बाबांचे समाधी होण्याचे काही महिने आधी खरेदी करून संस्थानला अर्पण केली. या बागेत बाबा दिवसातून दोन वेळा सकाळी व दुपारी जात असत व काही तास एकांतात बसत असत.) गेलेले पाहून सभामंडपात पाळणा बांधला आणि कीर्तनाचा थाट केला. पुढे वेळेवर श्रोते आले व बाबा (लेंडीबागेतून) परतले. काका पेटीवर (वाजविण्यासाठी) येऊन बसले. (इतक्यात) बाबांनी त्यांना बोलावणे पाठविले. ''बाबा तुम्हाला बोलवीत आहेत'' हे शब्द ऐकताच काकांच्या पोटात धस्स झाले. ''काय झाले मनाला कळत नाही. कथेचा विरस (रसभंग) न होवो (कथेच्या उत्साहावर विरजण न पडो).'' बाबांचे निमंत्रण ऐकून काकांची तेथेच गाळण उडाली (घाबरून गेले). ''बाबांचे मन क्षुब्ध का बरे झाले? कीर्तन निर्विघ्नपणे पार पडेल ना?'' काका पुढे चालत व मागे पाहत भीतभीत मशिदीच्या पायऱ्या चढू लागले. पाऊले मंद मंद (हळू हळू) पडत होती. काका फार चिंताग्रस्त झाले होते. बाबा त्यांना विचारू लागले, ''हा पाळणा येथे कशासाठी बांधला?'' (काकांनी) कथेचे तात्पर्य (सारांश) व उत्सवाची योजना (व्यवस्था) सांगितली व ती ऐकून बाबांना आनंद झाला. मग तेथे जवळच असलेल्या निंबारातून (कोनाड्यातून) एक सुंदर हार घेऊन काकांच्या गळ्यात घातला व आणखी एक भीष्मांकरिता पण दिला. पाळण्याचा प्रश्न विचारल्यावर मोठी काळजी उत्पन्न झाली होती. परंतु तो हार गळ्यात पडल्यावर सर्वांची काळजी दूर झाली. (निश्चिंतता आहली) (ओ. ५८-८१)

आधीच भीष्म बहुश्रुत (पुष्कळ गोष्टींचे ज्ञान असलेले) व विविधकथा पारंगत (नाना प्रकारच्या कहाण्या सांगण्यात पटाईत), त्यामुळे कीर्तन रसभरित (चटकदार

मनोरंजक) झाले व श्रोत्यांना अपरिमित (अमर्याद) आनंद झाला. बाबांचाही चेहरा (वदन) प्रसन्न दिसला. व जसे अनुमोदन (संमती) दिले तसेच कीर्तन भजनसह उत्सव करवून घेतला. रामजन्माच्या वेळी (अवसरी) बाबांच्या डोळ्यात गुलाल पडला आणि कौसल्याच्या (श्रीरामाच्या मातोश्रीच्या) मंदिरात (महालात) श्रीरामाऐवजी जणूकाय बाबाच नरसिंह (नरहरी) रूपाने प्रकटले. गुलालाचे केवळ निमित्त (मीष) होते. रामजन्माचा तो आवेश (उत्साह) होता. आता अहं(अहंकार)रूपी रावणाचा नाश होईल व दुर्वृत्ति (दुराचरण)रूपी राक्षस मरतील. (बाबांना) एकाएकी कोप (क्रोध) आला. (जणूकाय) प्रत्यक्ष नरसिंहाचे रूपच. (दैत्यांचा नास्तिक राजा हिरण्यकशिपू याचा वध करण्यासाठी विष्णूने घेतलेले सिंहाकृती मनुष्यरूप जे दिसायला भयंकर व अत्यंत क्रोधयुक्त होते.) शिव्याशाप सुरु झाले आणि त्यांचा भरपूर (अमाप) वर्षाव झाला. राधाकृष्णामाई पाळण्याचे तुकडे होतील म्हणून मनात गडबडून गेल्या. तो कसा धड (सुरक्षित) राहील याचे त्यांना सांकडे (संकट) पडले. 'सोडा सोडा, लवकर सोडा' असा त्यांचा पाठीशी लकडा (आग्रह) लागल्यामुळे काका तो पाळणा सोडायला पुढे सरकले तो बाबा अत्यंत खवळले (कावले) आणि काकांच्या अंगावर धावून गेले. मग पाळणा सोडणे जागीच राहिले आणि बाबादेखील वृत्तीवर आले (शांत झाले). पुढे दुपारी आज्ञा मागितली असता बाबा आश्चर्याने म्हणाले, "आताच पाळणा कसा सोडता? अजून त्याची आवश्यकता आहे की!" ही आवश्यकता तरी कसली? साईबाबांचे शब्द चुकीचे किंवा उगाच कारणाशिवाय (अन्यथा) नसणार. (नंतर) विचार केल्यावर लक्षात आले (बुद्धि स्फुरली) की उत्सवाची साङ्गता (सर्व संस्कार होऊन यथास्थित संपूर्णता) झालेली नव्हती. येथपर्यंत उत्सव झाला परंतु जोपर्यंत दुसरा दिवस नाही उगवला व गोपाळकाला (गोकुळ अष्टमीच्या उत्सवाच्या शेवटी किंवा श्रीकृष्णाच्या अन्य उत्सवाच्या शेवटी दहीहंडी फोडणे, फुगड्या खेळणे, नाचणे इ. मजेचा समारंभ करतात तो) नाही झाला तोपर्यंत उत्सव यथास्थित संपूर्ण झाला (साङ्गता झाली) असे म्हणू नये. अशा प्रकारे दुसऱ्या दिवशी गोपाळकाला व कीर्तन झाल्यावर पाळणा सोडण्याची आज्ञा बाबांनी दिली. (ओ. ८२-९३)

पुढील वर्षी भीष्म नव्हते म्हणून बाळाबुवा सातारकरांना (कीर्तनासाठी) आणावयाचे होते. परंतु त्यांना कवठे (सांगली जिल्ह्यातील एक गाव) येथे रामनवमीच्या उत्सवाचे वर्षासन (वार्षिक नेमणूक) असल्याने तेथे जाणे होते. म्हणून काका महाजनी बाळाबुवा नावाच्याच (दुसऱ्या) भक्तिमान (भजनी) व्यक्तीला ज्यांची 'अर्वाचीन तुका' (आताचे तुकाराम महाराज) म्हणून प्रसिद्धी होती त्यांना घेऊन आले, आणि त्यांचे हातून उत्सव साजरा करविला. हेही मिळाले नसते तर काका महाजनीच कीर्तनाला उभे राहिले असते. दासगणूंचे (राम) नवमीचे आख्यान (दृष्टांतरूप कथा) त्यांना पाठ

होतेच. तिसरे वर्षी (सन १९१३ साली) बाळाबुवा सातारकरांचेच शिरडीला वेळेवर येणे झाले. कसे ते काळजीपूर्वक ऐका. साईबाबांची कीर्ती ऐकून बाळाबुवा सातारकरांच्या मनात त्यांच्या दर्शनाची इच्छा उत्पन्न झाली. परंतु वाटेत सोबत पाहिजे व ती कशी लाभेल याची त्यांना चिंता होती. बाळाबुवा स्वत: हरदास (कीर्तनकार) होते. साताऱ्याजवळ त्यांचे राहण्याचे मूळ ठिकाण होते. (परंतु) त्यावेळी त्यांचा मुक्काम मुंबईला परळ येथे होता. सातारा (सध्याचा सांगली) जिल्ह्यात बिऱ्हाड सिद्धकवठे नावाचे (फार जुने) देवस्थान (पवित्र स्थान) आहे. बाळाबुवांना तेथील रामनवमीच्या कीर्तनाची वार्षिक नेमणूक (वर्षासन) होती. आषाढीची एकादशी व चैत्र महिन्यातील रामनवमी या दोन वार्षिक उत्सवांशी बाळाबुवांचा संबंध होता. (अकबर) बादशाही सनद (शासनपत्र) पाहता बडे बाबांच्या (देवाच्या) खर्चाकरिता एकशे चोविस (चतुर्विंशति तां) रुपयांची सरकारकडून (संस्थानी) मूळ व्यवस्था होती. असो. या दोन उत्सवांसाठी बाळाबुवांची बिदागी (देणगी) तीस (त्रिंशत) रुपये होती. परंतु ह्या वर्षी कवठ गावात महामारीची (मरगीची) साथ आली आणि गावकऱ्यांवर कठिण परिस्थिती (प्रसंग) येऊन ठेपली. रामनवमी राहिली व तेथून बुवांना पत्र आले की आता पुढच्या वर्षी यावे. गावच रिकामा झाला आहे. सारांश रामाची सेवा चुकली. बिदागीही जागच्या जागीच राहिली व शिरडीला जाण्याची संधी मिळाली. बाळाबुवांनी काकासाहेब दिक्षितांची भेट घेतली. दीक्षित बाबांचे परमभक्त आहेत. त्यांनी मनांत आणले तर आपले शिरडीला जाण्याचे मनोगत पूर्ण होईल. आणि स्वार्थ व परमार्थ (दोन्ही) साधतील असा विचार करून ते दीक्षितांना म्हणाले, ''यंदा आमचे वर्षासन राहिले. (तेव्हा) बाबांचे दर्शन घ्यावे व तेथेच कीर्तन करावे असे वाटते.'' त्यावर भाऊसाहेब (दीक्षितांना लोक भाऊसाहेबही म्हणत असत) म्हणाले, ''बिदागीबद्दल खात्री नाही. देणे न देणे बाबांच्या हाती असते. कीर्तनासाठीदेखील त्यांचीच संमती लागेल.'' इतके संभाषण चालत असता काका महाजनी अवचित आले व शिरडीचा प्रसाद व उदी वाटू लागले. (बुवांना) हा शुभशकुनच वाटला. काका महाजनी त्याचवेळी (नुकतेच) शिरडीहून आले होते. क्षेमकुशलवृत्त (सुख-खुशालीची बातमी) कळवून मग ते आपल्या घरी (निजसदनी) परत गेले. असो. पुढे दीक्षित बाळाबुवांना मोठ्या प्रेमाने म्हणाले की मी बाबांची संमती विचारीन आणि ती दिल्यावर तुम्हाला नक्की (निश्चित) कळवीन. (माझे) पत्र येताच शिरडीला यावे. वाटखर्चाला न भ्यावे (भिऊ नये), त्यासाठी आपण न झिजावे (त्रास घेऊ नये), मनात नि:शंक असावे. असो. पुढे दीक्षित (शिरडीत) गेले. बाबांनी अनुमोदन (संमती) दिले. (मग) बाळाबुवा शिरडीत आले आणि त्यांना इच्छिलेल्या प्रमाणे (यथेष्ट) घडले. साईबाबांनी देखील रामनवमीचा उत्सव-सोहळा आपल्यासमोर (सन्मुख) बाळाबुवांच्या हस्ते मोठ्या प्रेमाने

व कौतुकाने करवून घेतला. बाळाबुवांच्या हस्ते मोठ्या प्रेमाने व कौतुकाने करवून घेतला. बाळाबुवांना पण मनात संतोष वाटला (तुष्टले) की चिंतिलेले कार्य पार पडले, साईबाबादेखील प्रसन्नचित्त झाले. आणि सर्वांच्या इच्छा (मनोरथ) पूर्ण झाल्या. बाळाबुवांची संभावना (बिदागी) सुद्धा यथास्थित झाली. दीडशे (शतोपरी पंचाशत) रुपये घ्यावयास आज्ञा झाली व बुवांना अमर्याद (अपरिमित) आनंद झाला. पाच वर्षांची कवठ्याची प्राप्ती एकाच उत्सवात बाबांनी दिली मग बाळाबुवा का बरे खुष होणार नाहीत? त्यांनी बाबांचे आभार मानले. असो. पुढे (सन १९१३ नंतर) एके दिवशी दासगणू (कै. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे. अर्वाचीन संत चरित्रांचे कर्ते व प्रसिद्ध कीर्तनकार) शिरडीत आले असता (काकासाहेब दीक्षितांनी) बाबांना विनंती करून दरवर्षीचा उत्सव त्यांना (कायमचा) देवविला. तेव्हापासून आजपर्यंत (हा कालवरी) हा जन्मोत्सव अनेक वाद्यांच्या एकत्रित आवाजात व नामस्मरणाच्या जयघोषात (गडगजरी) उजविला जात आहे, आणि पोटभर (आकंठ) अन्नसंतर्पणाने (अन्न देऊन तृप्ती करण्याने) महारापोरांना (गावातील गरीब लोकांना) आनंद होत असतो. समाधी (मंदिराच्या) महाद्वारावर मंगल वाद्यांच्या गजरात साईनामाचा घोष मोठ्या हर्षभराने आकाशात भरगच्च घुमत असतो (अंबरी कोंदाटे). (ओ. ९४-१२०)

गोपाळ गुंडांना जशी यात्रेबद्दल किंवा उरुसाबद्दल स्फूर्ती झाली तशीच त्या जीर्ण (जुन्या पडक्या) मशिदीला गोंडस (सुंदर नीटनेटके) रूप आणावे अशीही त्यांना इच्छा झाली. मशिदीचाही जीर्णोद्धार (जुने देऊळ इ. ची नवीन बांधणी किंवा डागडुजी करणे) आपल्या हस्ते चांगला (साचार) व्हावा असा भक्त गोपाळ गुंडांचा निश्चय (निर्धार) झाला आणि (त्यांनी त्यासाठी) दगडही (पाषाण) तयार करविले. परंतु या जीर्णोद्धाराचा योग गुंडांच्या भागी (हिस्स्यात) नव्हता. (बाबांनी ते दगड शिरडीतील गणपती, शनी व शंकर यांच्या देवळाच्या जीर्णोद्धारासाठी लावविले) मशिदीच्या या विशिष्ट कार्यासाठी काही काळानंतर (पुढारा) मनासारखा योग जुळून आला. बाबांच्या मनात हे कार्य नानासाहेब चांदोरकरांनी करावे आणि त्यानंतर मागाहून फरसबंदी काकासाहेब दीक्षितांनी करावी असे होते. तसेच पुढे घडून आले. आधी आज्ञा मागून थकले. मग म्हाळसापतींना (सोनार जातीचे बाबांचे परमभक्त हेच 'आवो साई' म्हणून बाबांना प्रथम सामोरे गेले होते. अ. ५ आ. २९) मध्यस्थी घातले. तेव्हा बाबांनी अनुमोदन दिले. असो. जेव्हा मशिदीत एका रात्रीत (निशीत) फरसी (दगडी चीपांनी केलेली जमीन) झाली, तेथून मग दुसऱ्याच दिवशी बाबा (तरट किंवा गोणपाटाचा तुकडा सोडून) गादीवर बसले. सन १९११ साली सभामंडप (मंदिराच्या गाभाऱ्यापुढे कीर्तन-पुराणादि करिता बांधलेली आच्छादित मोकळी जागा) झाला. पण त्यासाठी केवढा प्रचंड खटाटोप आणि महाव्याप? सगळ्यांचा थरकांप झाला. तेही कार्य अशाच

रीतीने अशीच सर्व परिस्थिती असताना एकाच रात्रीत भक्तांनी मोठ्या कष्टांनी पूर्ण केले. (त्यांनी) रात्री प्रयत्नपूर्वक खांब दाटावे (जमिनीत पुरावे) व बाबांनी ते सकाळी उपटू लागावे. भक्तांनी मोका (अवसर) साधून पुन्हः चिंणावे (दगड टाकून भरावे). अशाप्रकारे सगळ्यांनी थकून जावे (शिणावे सकळिकी). सर्वांनी कंबर बांधून कामाला लागावे (घालावी कास), रात्रीचा दिवस करावा आणि अतिशय कष्ट सोसून मनाचा हव्यास (उत्कट इच्छा) पुरवावा. आधी येथे उघडे आंगण होते. तेथे एवढेसे पटांगण (मोकळी जागा) होते. काका दीक्षितांना वाटले सभामंडपासाठी ही योग्य जागा आहे. लागेल तितका पैसा (पैका) खर्च करून लोखंडाचे खांब व कैंच्या (तिकटद्या म्हणजे तीन तुळ्या एकत्र जुळवून केलेली त्रिकोणाकृती रचना) आणून, बाबा चावडीत गेलेले पाहून हे काम साधून घेतले. (बाबा एक रात्र मशिदीत आणि एक रात्र जवळच्या सरकार चावडीत राहात तें रात्री ९ वाजता चावडीत पुष्कळ भक्तांसह वाजतगाजत असे जात. तें मशिदीच्या आवाराबाहेर पडले की त्या रात्री या मंडळीच्या कामाला सुरुवात होत असे). भक्तांनी रात्रीचा दिवस करून मोठ्या प्रयत्नांनी खांब जमिनीत दाटावे (चिणावे) व चावडीतून परत येण्याचाच अवकाश की बाबांनी ते उपटून टाकण्याचा प्रयत्न करावा. (ओ. १२१-१३३)

एकदा बाबा अत्यंत रागावले (कोपायमान). एका हाताने त्यांनी तात्यांची (कोते पाटील. बायजाबाईंचे चिरंजीव) मान धरली आणि दुसऱ्या हाताने एक खांब हालवून उपटू पाहू लागले. हालहालवून तो ढिला केला, तात्याचे डोक्याचा फेटा काढला, काडी लावून पेटवून दिला आणि रागाने खड्ड्यात टाकला. त्यावेळचे त्यांचे ते डोळे जणूकाय विस्तवाचे (अनल) गोळेच दिसत होते. समोर (सन्मुख) कोण पाहू शकेल? सगळ्यांचे धैर्य खचून गेले. मग (बाबांनी) लगेच खिशात हात घातला, एक रुपया बाहेर काढला व तोही तेथेच (खड्ड्यात) टाकला (निक्षेपिला). जणू काय तो सुमुहूर्तच केला. शिव्याशापांचा वर्षाव झाला. तात्या देखील मनात फार घाबरले की फार कठीण प्रसंग आला. हा प्रकार कसा झाला कोण जाणे. गावलोक आश्चर्यचकित (विस्मयापन्न) झाले. हे काय आज दुश्चिन्ह (अशुभ लक्षण)? तात्या पाटलावरचे संकट कसे निवारले जाईल? (पुढे) भागोजी शिंद्याने (याचे मुखहस्तपादादि सर्व अवयव महाव्याधीने ग्रस्त असल्यामुळे लोक याचे वाऱ्यास उभे राहात नसत. तथापि हा बाबांचा इतका भक्त होता की बाबा मशिदीत असता नित्य सकाळी आपल्या हातापायांस तळव्यांपासून कोपरा-ढोपरापर्यंत याचेकडून तूप चोळवून घेत आणि मशिदीपासून लेंडीपर्यंतच्या सकाळच्या नित्य फेरीत हाच साईबाबांचेवर एका हाताने छत्री धरून व दुसरे हाताने पाण्याचे टमरेल घेऊन बाबांचे बरोबर लेंडीवर जातयेत असे) धीर केला. हळूहळू पुढे सरकला. (परंतु) तोही आयताच सापडला व बाबांनी

मनसोक्त (यथेष्ट) चांगला बडविला (धुमसिला). माधवरावही (कै. माधवराव देशपांडे. बाबांचे यांजवर अत्यंत प्रेम होते व त्यांना ते 'शामा' या नावाने हाक मारीत. लडिवाळपणे बाबांना अरे तुरे म्हणण्याची सलगी दुसऱ्या कोणाच्याही नशिबी नव्हती) हाती लागले व तेही विटांचा प्रसाद पावले. जे जे मध्यस्थी करावयास गेले त्यांना लगेच बाबांनी (मारण्याचा) प्रसाद दिला (अनुग्रहिले). आता बाबांपुढे कोण जाईल? तात्यांची सुटका कशी करावी? (लोक विचार करू लागले) तोच म्हणता म्हणता बाबांचा राग कमी कमी (क्षीण) होऊन शांत (शमन) झाला. तात्काळ बाबांनी दुकानदार बोलाविला. जरीचे काठ असलेला फेटा आणविला आणि स्वतःच तात्याचे डोक्यास बांधला. जणूकाय त्याला शिरपावच (राजा किंवा सरदार ह्यांनी कृपावंत होऊन दिलेले पागोटे, वस्त्रे इ. बहुमानाचा पोशाख) दिला. लोक आश्चर्यचकित झाले की काय कारण या रागाला? तात्यांवर हा हल्ला कशासाठीं आणि बाबांनी ही आरडाओरड (गिल्ला) का केली? रागाला (कोपास) काय काय कारणाने ते चढले आणि पाहता पाहता एका मिनिटात (क्षणात) प्रसन्नचित्त (आनंदित) कसे झाले याचे यत्किंचितही कारण कोणाला निश्चितपणे कळले नाही. (बाबा) कधी शांत असत व प्रेमाने गोष्टी सांगत असत तर कधी क्षण न लागता व निमित्त न लागता (अवचित) अचानक रागाने संतापलेले (क्षुब्धचित्त) असत. (ओ. १३४-१४६)

असो. अशा या बाबांच्या गोष्टी. एक सांगू जाता आणखी दुसरी आठवते. कोणती सांगावी व कोणती मागे ठेवावी (आता सांगू नये) हे कळत नाही आणि प्रपंचवृत्ति (पक्षपात करणे) तर बरी नव्हे. मलाही आवडनिवड करवत नाही. जशी ज्या कथेला सवड मिळेल तशी ती श्रोत्यांची हौस आणि ऐकण्याची इच्छा पुरवेल. म्हाताऱ्या लोकांकडून ऐकलेल्या (वृद्ध+मुख+श्रुत) पूर्वीच्या गोष्टी, साईबाबा हिंदू की यवन (मुसलमान) हे सर्व वर्णन (निरूपण) पुढील अध्यायांत (माझ्या) बुद्धिप्रमाणे करीन. दक्षिणेच्या निमित्ताने पैसा घेऊन तो (मंदिरांच्या) जीर्णोद्धारासाठी कसा लावीत, धोतीपोती (हटयोगाच्या साधनांपैकी पोटाच्या आंतडी शुद्ध करण्याचा एक प्रकार), खंड दुखंड (हटयोगाच्या साधनांपैकी शरीराचे तुकडे तुकडे करून ते जोडण्याचा एक प्रकार) करून शरीराचे कसे दमन करीत (देह कसा दंडीत), दुसऱ्यांसाठी कसे कष्ट वेचीत आणि भक्तांची संकटे घालवीत हे पुढच्या अध्यायात स्पष्ट होईल व श्रोत्यांना संतोष वाटेल. (ओ. १४७-१५१)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साई समर्थ यांच्या सत्य चरित्राचा ''रामजन्म+उत्सवादि कथनं'' (श्रीरामजन्म-उत्सव वगैरेचे वर्णन) नावाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

**श्रीसद्गुरू साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

साधनेच्या विश्वात

- चकोर आजगांवकर

# दिव्य जीवनाकडे - १३

## साक्षात्कारापूर्वी मन, बुद्धि, भाव, संकल्प यांची पूर्वतयारी अर्थात्

## योग भक्तीचे मानसशास्त्र

निरनिराळ्या थोर महात्म्यांच्या, संतांच्या व विचारवंतांच्या साधनाजीवनावरील व प्रत्यक्ष साधनेवरील विचारांचा येथवर मी परामर्श घेतला. साधनेची पूर्वतयारी व साधनेचे तंत्र यांचाही ज्ञानी व विद्वानजनांनी घेतलेला आढावाही आपल्यापुढे प्रसंगत: मांडला. आता साधनेकडे नव्या क्रियाशील भूमिकेतून पुन्हा पाहू या.

या पूर्वीच्या विवेचनात साधनेची पूर्वतयारी म्हणून सद्गुण, चारित्र्य, करुणा, सेवाभाव हे सात्त्विक गुण अंगात बाणावयास हवेत, हे वाचकांना स्पष्टपणे समजलेले आहेच. सद्गुण ही दैवी संपत्ती आहे. योगशास्त्रातील यम नियमांनी सुद्धा हे गुणी व संयमित जीवनच सुचविले जाते. **आपले नेहमीचे स्वार्थी, स्वयंकेंद्रित, लोभांनी, द्वेष, मत्सराने भरलेले जीवन साधनेच्या दृष्टीने मुळीच उपयोगाचे नाही. इतकेच नव्हे तर साधनेला व त्यांतील प्रगतीला ते मारकच आहे.** मुख्य प्रश्न असा आहे की माणसाचा स्वभाव, त्याची वागणूक, मन, बुद्धि, अहंकाराच्या आविष्काराची पद्धत तो सहजासहजी बदलत नसतो. आयुष्यात घोर निराशा, आघात व दुःखाचे प्रहार अनुभवल्यानंतरच त्याचे मन विरक्त वा ईश्वर सन्मुख होत असते. ज्यांना जन्मत:च सात्त्विकता, ईश्वरप्रेम व निस्वार्थता ही दैवी संपत्ती मिळालेली असते असे पूर्वजन्मसुकृताने शोभणारे पुण्यजन जगात सांपडणे विरळाच. आपल्या स्वत:मध्ये साधनेला अनुकूल असा आंतरिक बदल करावा असे आपल्याला कधी वाटणार व असा बदल घडवावयास आपण कधी झटणार आहोत याची कसोटी परमेश्वर त्याने निर्मिलेल्या सुखदु:खात्मक प्रसंगांनी भरलेल्या जीवनाद्वारे पहात असतो. **ज्याच्या मनांत प्रामाणिक बदल झाला आहे व प्रभुप्राप्तीचा जो निष्ठेने व निरलसपणे प्रयत्न करीत आहे, अशा पासून परमेश्वर तसा काही दूर नसतो.** फक्त त्याच्या मन, बुद्धि, अहंकाराचा मळ शुद्ध करण्याची प्रक्रिया व त्याच्या मनात साक्षात्काराचा दिव्य प्रकाश पडेल असे जीवन जगण्याची प्रेरणा ही गुरुकृपेने निर्माण व्हावयास हवी असते.

ही मानसिक, शारीरिक व बौद्धिक पूर्वतयारी हे साधनेस अत्यावश्यक असे

अंग असते. आपण आपले जीवन न बदलता वागतो तसेच आपण या गोष्टीचे महत्त्व विसरतो किंवा त्याकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे साधनेची पहिली पायरी सुद्धा आपण ओलांडीत नसतो. आपले पूर्वीचे स्वार्थी वा वासनामय आयुष्य साफ बदलावयास हवे. मगच शरीर व मन शुद्ध होते हे आपण सोयिस्करपणे विसरतो. यम व नियम या अष्टांग योगातील दोन अंगांनी हेच सुचविले जाते. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह इत्यादी 'यम' या शीर्षकाखालील शिस्तीमुळे शरीरातील इंद्रियांची वस्तूबद्दलची आसक्ती कमी होऊन शरीराची शुद्धी होण्यास मदत होते. शरीर सतेज होते, नैतिकतेचे तेज मनांत उतरते. आसक्तीवर आधारलेला वैयक्तिक स्वार्थ आवरता येतो. वस्तूंचे, इच्छांचे प्राबल्य कमी होते. 'नियम' या शीर्षकाखाली आपण पावित्र्य, प्रेम, करुणा हे सद्‌गुण अंगी बाणवितो. नियम म्हणजे शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरावर प्रणिधान असे मानसिक शिस्तीचे गुण अंगात स्थिर करणे. यात काही व्यायाम, प्राणायाम, आसने, तपे, जप, व्रते शरीरकष्टही समाविष्ट होतात. त्याने शरीराची बाह्य शुद्धी साधते. संतोषामुळे मनुष्य आत्मतृप्त रहातो. मौन व मन:शांती यामुळे माणसाची जाणीव बाहेरील व्यत्यय वा व्यग्रतेच्या कक्षेतून मुक्त होते व अंतर्मुखपणे विचार करू शकते. **सत्य, ब्रह्मचर्य व मौन पाळणाऱ्यास पुष्कळशी सौख्याची द्वारे आपोआप उघडी होतात**. अशा शुद्ध शरीराच्या मौन व संयम पाळणाऱ्या साधकाने तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान हे 'नियम' आचरल्यास त्या मुक्त जाणीवीत परमेश्वराचे प्रेम, सर्वाभूती करुणा, मानवतेची सेवा इत्यादि दैवी सद्‌गुण स्थापित करण्यास वाव मिळतो. जपामुळे मन व बुद्धी परमेश्वराच्या नामरुपावर केंद्रित करून त्याची कृपा व करुणा याचे किरण आपल्याकडे आकर्षित करून घेता येतात. स्वाध्याय ही या पुढची पायरी. यांत स्वत:स साधक स्वत: शिकवित असतो व ईश्वराभिमुख होत असतो. या पुढची ईश्वरप्रणिधानाची पायरी मन, बुद्धि व अहंकाराला प्रभूशी जोडण्याची प्रक्रिया आहे. यांत नवविधा भक्तीच्या स्मरण, चिंतन, संकीर्तन, अर्चन, आत्मनिवेदन इत्यादी पायऱ्या समाविष्ट होतात. यामुळे जाणीव ही प्रभूच्या सन्मुख होऊन त्यावर प्रेम करावयाचे शिकते. प्रभूवर प्रेम स्थिर झाल्यास शरीरशुद्धी, मन:शुद्धी, करुणा, मानवता, इत्यादि दैवी संपदा फार सुलभपणे साधकाला वश होतात. **'यम', 'नियम' या योगातील संज्ञांचा सोपा अर्थ म्हणजे शरीर व इंद्रिये यांची नैसर्गिक आसक्ती सोडणे व शुद्ध मनाने परमेश्वरावर स्थिरपणे उत्कट प्रेम करणे**, हा होय. थोडक्यात मनाची बाह्य वस्तूकडे धावण्याची प्रवृत्ती थांबवून आत्म्याकडे त्याला परत आणायची ही प्रक्रिया आहे. वस्तूकडे जाणारे मन त्या वस्तूचे ममत्व घेऊनच परत येते. वस्तू व मन यातील ममत्वाचे धागे निर्माण होणार नाहीत, अशी अनासक्ति व कमलपत्रवत् अलिप्तता निर्माण करायची हे साधनेद्वारे साधायचे आहे. **अलिप्त असा संतोष, आत्मतृप्त आनंद मिळवायचा आहे. या संतोषातच ज्ञानाचे दार लपलेले आहे.**

**आनंदाचे हेच प्रवेशद्वार आहे.** एका विचाराने अन्य विचार थांबवायचा आहे. विचार व संकल्प थांबविल्यास शुद्ध पवित्र जाणीव निर्माण होते. इच्छांच्या जाळ्याने मन निर्माण होते. निरिच्छता म्हणजे शांति. ही निरिच्छता मिळवायची ही साधना असते. जिभेवर नाम, श्वासात नाम डोळ्यांत रूप बिंबवून मन, बुद्धी परमेश्वरमय करावयाची साधना साधकाला साधायची आहे. **इच्छेत ईश्वरेच्छा मिळवून 'ईच्छा' नावाच्या दुःखाचे सुखात रुपांतर करावयाची ही साधना होय. इंद्रियाचे नियंत्रण मनाने, मनाचे प्राणाने, प्राणाचे लयाने व लयाचे नादाने अनुसंधान करणे ही साधना होय.** मनांत संकल्पाचे बेत (प्लॅनिंग) नसावेत की गतकाळच्या स्मृतीबंध नसावेत. तेव्हाच मन साधनेच्या दृष्टीने मुक्त व योग्य रहाते. यासाठी ही मन, बुद्धी, कर्मशुद्धी व संयमाची प्रक्रिया हाती घेणे अटळ असते. तेव्हाच पुढील पायऱ्या म्हणजे आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान धारणा इत्यादींची वाट मोकळी व सुलभ होते. ही साधनेची पूर्वतयारी म्हणजे पैसा, सत्ता, स्त्री व कीर्ति या चार आकर्षणात सुख मानणाऱ्या आसक्त मानवी मनाला परत फिरवून परमेश्वरावर एकाग्र, चारित्र्यनिष्ठ, निस्वार्थी, प्रेमकरुणामय, विश्वकल्याणपर बनविणे!

खरा आनंद या मधूनच निर्माण होतो. प्रत्येक सत्कृत्य व सद्भाव हा आपल्याला देवाकडे नेतो. साक्षात्काराच्या वाटेवर प्रगत करतो. भोग व वैचित्र हे सुख नाही. देह म्हणजे मी नव्हे, ही सत्यजाणीव यातूनच मनाला भावित होते. प्रेम हे प्रशांतीचे साधन आहे. मानवाची एकता व आत्मज्ञान या प्रशांतीतून फुलते. **ही प्रशांति म्हणजे सतत वाहणारे समाधान. नि:स्वार्थी पण श्रद्धायुक्त जीवन, सत्य, प्रेम, ज्ञान व शांति होय. यामुळेच मानवाला आपला आत्मा देहाच्या मनाच्या पंचकोशातून वेगळा, भिन्न व प्रकाशमान असल्याचे समजते.** ही एक एक कोष टाकून मूळ प्रकृतीकडे प्रवास करणारी साधना होय. मानव हा ईश्वर आहे, ही जाणीव प्रकट करणारी ती साधना होय. त्यासाठी मन व देह शुद्धीने व बुद्धि परमेश्वराशी संयोगित करून अहंकारात वा जाणीवीत विशुद्ध मी निर्माण करावयाचा असतो. हा शुद्ध मी परमेश्वराचा (विश्वात्मक देवाचा) देहातील अंश असतो. या शुद्ध मी मधूनच साधनेचे, प्रेमाचे, साक्षात्काराचे, सुखाचे व मुक्तीचे दरवाजे उघडतात. म्हणूनच साधनेच्या या पूर्वतयारीत मन, बुद्धि, देह व अहंकार सुधारण्याचा, संस्कारण्याचा व शुद्धकरण्याचा भाग अटळपणे असावा लागतो. हे एवढे आवर्जून स्पष्ट करण्याचे कारण आजच्या स्वार्थकेंद्रित व धावत्या आयुष्यात मनुष्य मन, बुद्धी व देहाच्या शुद्धतेपासून फार दूर गेला आहे व त्याला साधक व्हावयाचे असेल तर मूळ पदावर यावयाचा प्रामाणिक व कृतीशील प्रयत्न करणे आवश्यक आहे, हे पटावयास हवे आहे. **पैसे देऊन दुकानातून एखादी वस्तू आणावी तसे आत्मज्ञान व दैवी जीवन मिळविणे कदापिही शक्य नाही. आपले स्वत:चे आंतरिक परिवर्तन करूनच**

**आपल्याला दैवी जीवनाला विनम्रपणे सादर व्हावे लागेल, सामोरे** जावे लागेल. एखाद्याला बौद्धिकदृष्ट्या साधनेचे मोल व आवश्यकता समजली तरी ती प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी त्याला आवश्यकता त्याग, आंतरिकबदल व आत्मसमर्पण करावे लागेल. याला पैसा, सत्ता, संघटना इत्यादि व्यावहारिक मार्ग उपयोगी पडणार नाहीत.

चित्ताची शुद्धी व तद्रुपता व्हावी हा या पूर्वतयारी मागील मूळ उद्देश असतो. यासाठी मन, बुद्धिची उपरति आधी व्हावी लागते. इंद्रियांच्या भोगाच्या सन्मुख असलो तरी मन विषयाकार होऊ न देण्याची ही साधना आहे. प्रभूप्रेमाचे दोर ओढले की मीपणाचे दोर ढिले होतात. हृदय हे सगुण परमात्म्याचे स्थान आहे. नाभी हे कृतीशील चेतनेचे स्थान आहे. तालुस्थान हे ब्रह्मरंध्राचे प्रवेशद्वार आहे तर ब्रह्मरंध्र हे शिवशक्तीमीलनस्थान आहे. **या दिव्य जीवनाच्या प्रवेशद्वाराच्या उंबरठ्यात पाऊल पडावे म्हणूनच ही पूर्वतयारीची साधना साधकाला कसोशीने पार पाडावी लागते. नाभी व आज्ञा चक्री व्यष्टीरूप असलेली जाणीव ही हृदयाजवळ व्यापक समष्टीरूप व्हावी लागते. या समष्टीसाठी व्यापक करुणा, मानवता, उदात्त भक्ती या भावनांचा हृदयात उल्लास होत असतो.** हृदयात सगुण देवाचे प्रेम स्थिर झाल्यावरच अहंकार (व्यष्टीरूप जाणीव) ओलांडून आपल्याला व्यापक समष्टीरूप सामरस्यात प्रवेश मिळतो. यांत सगुण, निर्गुण, व्यष्टीसमष्टी ऐक्याच्या ज्या प्रक्रिया घडतात त्यातूनच साधकाला पूर्णत्वाचे दान मिळू शकते. संयमाची साधना यापूर्वी वर्णिलेली आहे, तिच्यामुळे व वैराग्याच्या अवलंबामुळे हृदयस्थ समष्टीरूप परमात्म्याची इंद्रियाद्वारे पूजा घडविण्याची शिस्त बाणते. यामुळे हृदयस्थ परमात्म्यास आपण मन, बुद्धि, अहंकार व इंद्रियाद्वारे आपण अभिमुख होत असतो. **इंद्रिये मनासह हृदयात फिरविल्याने प्रेमसुख भावलहरी इंद्रियातून बागडू लागतात. येथे संयमाचे व वैराग्याचे रूपांतर प्रभूच्या प्रेमात व सात्त्विकभावांच्या निर्मितीत होते. म्हणजे वासना, इच्छा, मन हे स्वाधीन होते. बुद्धि, अहंकार तद्रूप होतो.** अर्थात संयम व वैराग्याची ही उच्च व प्रगत अवस्था आहे. केवळ पूर्वतयारीच्या पायरीवर ती त्वरित अनुभवता येणार नाही. त्यासाठी सेवा, साधना व प्रयत्न यांची काही काळ साथ असणे अत्यावश्यक राहील. हृदयात गुडाकेश (इंद्रियांचा स्वामी) परमात्मा रहातो. त्याला जागृत करण्याची ही उच्च पायरी आहे. भक्ती ही यांची वाहिनी आहे. यामुळेच संयम व शुद्धी यांच्या मधूनच त्या पलीकडे आपण भक्तांच्या प्रवाहात शिरतो. भक्ती भगवंताला मन, बुद्धि, अहंकारात ओढून आणते.

(क्रमशः)

---

# विष्णुसहस्त्रनाम

बाबांच्या चरित्रातील २७व्या अध्यायात विष्णुसहस्त्रनामाची कथा आलेली आहे. हेमाडपंतांनी अत्यंत रसाळ अशी ही कथा रंगविली आहे. तशी प्रत्येक कथा, घटना, शब्द हे बाबांच्या लीलेची अभूतपूर्व कहाणी आहे. त्यांची भक्तांविषयींची कळकळ, आत्मीयता, सहृदयता, आत्मकल्याणाची प्रेरणा-बुद्धि, मार्गदर्शन इत्यादि अनेक पैलूंची ओळख त्यांतून होते. संतांची उपदेशाची रीत न्यारी असते. त्यांचा अनुग्रह तशी घटना घडत असतांना लक्षात येत नाहीं. परिणामावरून ती लक्षात येते. घडतांना वाटणारी नवलाई फळाला पावल्यावर भक्तांना कृतकृत्य करते.

## - ग्रंथांची भेट -

पुष्कळसे भक्त बाबांना ग्रंथ अर्पण करीत असत. त्यांत अनेक उद्देश असत. लेखकाला बाबांनी आशीर्वाद द्यावा असें वाटे. कित्येकांना बाबांच्या हाती देऊन तो पावन होऊन परत मिळावा असाही भाव असे. त्यामुळे त्या ग्रंथांतील मतितार्थ कळेल असे त्या भक्तांना वाटे. बाबांचा तो प्रसाद असल्याचे समाधान त्यांना मिळे. अर्थात बाबा सर्व भक्तांना ते ग्रंथ परत करीत असत असें नाही. आपल्याकडे येणारा भक्त शहाणा व्हावा ही बाबांची मनोमन इच्छा असे. त्यामुळे ग्रंथ वाचनापेक्षाही प्रत्यक्ष अनुभव महत्त्वाचा असल्यानें ते भक्तांना याची जाणीव ग्रंथ स्वत:जवळ ठेवून घेऊन करून देत. नाथांचे भागवत त्यांनी श्यामाला (माधवराव देशपांडे) ठेवून घेण्यास सांगितले. दुसरी प्रत काका महाजनी घेऊन आल्यावर ती प्रसाद म्हणून परत केली. अर्थात् ग्रंथात काय आहे त्याची प्रचीति बाबा द्यायला तयार असतांना दर्शनाला येणारे त्याचा लाभ घेत नाहींत ही बाबांची खंत भक्तांना कळली नाहीं. पण हट्ट पुरवायचा म्हणून अतिशय सहृदयतेने तें भक्तांच्या इच्छा पूर्ण करीत.

## - रामदाशावर कृपा -

मशिदीत एक रामदासी आलेला. त्याचा नित्यनेम भस्मार्चन, स्नानसंध्या आणि विष्णुसहस्त्रनाम व त्याचे पाठोपाठ अध्यात्म रामायणाचे पारायण असा होता. निष्ठेने तो हे सर्व करीत होता. आपल्या पोथ्या तो काळजीपूर्वक जपून ठेवीत असे. ही लौकिक गोष्ट बाबांच्या लक्षात आल्याने त्यांनी रामदाशाची समज घालण्याकरितां एक युक्ती केली. पोटदुखीचे सोंग करून त्याला बाजारांत औषध आणावयास पाठविले व हळूच विष्णुसहस्त्रनामाची पोथी त्याच्या पोथ्यांमधून काढून घेतली व स्वस्थानीं येऊन श्यामास दिली. फार बहुगुणी आहे म्हणून देतो असे सांगून दिली. आपली पोटदुखी याच पोथीने थांबली व मी तरलो असे अल्लाला स्मरून सांगितले. श्यामाने

नकार देऊनही पोथी बळेच ठेवायला लावली. रामदाशी हे कळतांच संतापला. ज्या पोथीला तो जपत होता व जी त्याची पाठही झालेली होती, तेव्हां तसे पाहता त्या पोथीची गरज नसतांनाही त्या पोथीचा मोह त्याला अनावर झालेला बाबांनी निरिक्षण केला होता. ग्रंथावरून त्याचे लक्ष त्यांना ग्रंथात काय सांगितले आहे व ते कसे आत्मसात करावे हे बाबांना रामदाशास खुबीने पटवून द्यावयाचे असल्याने त्याचा संताप बाहेर पडल्यावर बाबांनी त्याची कानउघडणी सौम्य शब्दात करून रामदाशाने उदास व्हायला हवे, संतापी-उच्छृंखल वृत्ती सोडायला हवी असें या प्रसंगाने सांगून सावध केले. संतांची वागणूक ही अशीच छोटया पण मार्मिक प्रसंगातून लक्षात घ्यावयास हवी. रामदासी ग्रंथ वाचनात व्यग्र राहिला पण काय व कशाकरितां वाचतो याची जाणीव त्याला आली नाही. बाबांनी त्याला युक्तीने ती करून दिली. प्रत्यक्ष उपदेशाने जे काम झाले नसते ते या प्रसंगाने त्याला समजावून दिले. संतांच्या ह्रदयाची ओळख अशा प्रसंगाद्वारेच होते. याबरोबरच त्यांना श्यामालाही मार्ग दाखवायचा होता. एकाच प्रसंगांत दोघांना मार्गाला लावण्याचे कार्य बाबांनी केले.

## - श्यामावर अनुग्रह -

श्यामा ऊर्फ माधवराव देशपांडे हे बाबांचे निष्ठावान भक्त. अंत:करणपूर्वक बाबांची सेवा करीत. त्यांच्यावर अनुग्रह करण्यासाठी बाबांना रामदाशाचे निमित्त मिळाले. माधवराव फारसे सुशिक्षित नसतांना त्यांच्या वाणीवर सुसंस्कार व्हावेत म्हणूनही बाबांनी त्यांना ही विष्णुसहस्त्रनामाची पोथी दिली. माधवरावांवर बाबांचा जीव होता व त्यांच्या कल्याणाची चिंता होती. ती या रूपाने फळाला आली. बदललेल्या परिस्थितीत भगवन्नामासारखे सोपे, सुलभ साधन नाहीं म्हणून श्यामाला नामाचा अनुग्रह विष्णुसहस्त्रनामाच्या रूपाने बाबांनी केला. त्या पोथीची संथा श्यामास मिळून त्यांनी तिचे आयुष्यभर पारायणरूपाने पालन केले. हा कथाभाग हेमाडपंतांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीने २७व्या अध्यायांत केल्याचे साईभक्तांना परिचित आहेच. विष्णुसहस्त्रनामाचा परिचय क्रमश: करून देण्याचा आमचा मानस आहे.

**- कार्यकारी संपादक**

# "नाद-ब्रह्म"

गायनपद्धती हा संगीताचा एक महत्वपूर्ण घटक आहे, तर संगीत हाच मुळीं विश्वातील एक अजोड चमत्कार आहे. ह्या भूतलावर संगीताची निर्मिती व्हावी ह्या हेतूंच विश्वरचयितानें मनुष्यप्राण्याला श्रवणासाठीं कान आणि उच्चारांसाठी स्वरयंत्राचे दान दिलेले दिसतें. जगाच्या पाठीवर अनेक प्राणिमात्र ऐकणें आणि बोलणें ह्या महत्वाच्या शक्तींपासून वंचित आहेत. मानव जातीला हे अनमोल देणे देऊन विश्वकर्त्यानें खरोखरच आपणा सर्वांवर महान उपकार केलेले आहेत. मानवाने देखील ब्रह्माने दिलेल्या ह्या देणगीचा योग्य उपयोग करुन आपल्या प्रतिभेच्या बळावर, जगांतील निवडक नाद-निनाद एकत्रित व संकलित करुन परमेश्वराला अभिप्रेत असलेल्या संगीताची निर्मिती केली. आपल्या आयुष्यांतील अनेक क्षण संगीतामुळे आनंदमय झालेले असतात. संगीत ईश्वरीय आहे. गायनपद्धती हा संगीताचा आत्मा आहे. श्रेष्ठ गायनपद्धती संगीताला स्वर्गीय रुप देते. अनेक भाग्यवान जीव श्रेष्ठ गायन पद्धतीचें वरदान घेऊनच जन्मास येतात. तथापि, साधना व तपश्चर्या करुनदेखील श्रेष्ठ गायनपद्धती आत्मसात करता येते. ह्या साधनेस अध्यात्माची बैठक लाभली असल्यास दुग्धशर्करा योग जुळून ते संगीत सुंदर व स्वर्गीय बनते. परमेश्वराच्या भक्तीचे नवविधा प्रकार सर्वश्रुत आहेत. गायनाच्या माध्यमाद्वारेभक्तीपथावर वाटचाल करणे आपल्यापैकी बहुतेकांसाठी सुलभ व सहजसाध्य असते.

"मद्भक्ता: यत्र गायन्ति, तत्र तिष्ठामि, नारद"

भगवान श्रीकृष्णांनी असे आश्वासन दिलेलेच आहे. परमेश्वराच्या ध्यानसाधनेत नामस्मरणाचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. नामजप, नामघोष हे रुक्षपणें करण्यापेक्षां भगवंतांच्या नामावलींवर स्वर व ताल यांचा साज चढविला असतां, साधना सुखकर होते, साधकांस संतोष होतो आणि साधकाच्या सान्निध्यांतील परिसर शुद्ध, मंगलमय होतो. सुंदर स्वर-तालांचा साज चढवून गायिलेल्या भजनाद्वारे, प्रभूची केलेली साधना, आराधना व याचना साधकांस तसेंच समवेत असलेल्या सहकाऱ्यांना आनंददायक ठरते. षड्ज-पंचम ह्या वादी-संवादीच्या जोड स्वरांशी तंबोऱ्याच्या तारा जुळल्या आहेत, मंदिरात संपूर्ण अंधार असून फक्त समोर विराजमान झालेल्या साईबाबांच्या मूर्तीवर प्रकाशझोत आहे, चंदनाची अगरबत्ती मंदिराच्या परिसरात चंदनाचा सुगंध पसरवीत आहे. अशा मंगल वातावरणात फक्त तंबोऱ्याच्या जुळलेल्या तारा छेडा, बाबांच्या मूर्तीवर नजर कायम करा आणि वाजणाऱ्या सूरांत तुमचा ओंकार विलीन करा. परमेश्वराशी तादात्म्य पावून दिव्यत्त्वाची अनुभूती येते.



अध्यात्म आणि संगीत हे एकमेकांस पूरक आहेत. अध्यात्माची बैठक व अभ्यास असलेल्या संगीत साधकाचे संगीत स्वर्गीय व मंगल भासते ; तसेंच संगीताद्वारे अध्यात्माची साधना करणे अभ्यासकांस सुलभ आणि प्रिय असते. परमेश्वरावर निस्सीम प्रेम असणारे, भक्तिमार्गी संगीताचे उपासक जीवनात यशस्वी होऊन नावारुपास आलेले आपण पाहतो; ह्याउलट नास्तिक प्रवृत्तीचे, नशा व्यसनांत चूर राहणारे गुणी, प्रतिभावान कलावंत धुळीस मिळाले आहेत.

कविश्रेष्ठ दासगणू महाराजांच्या जीवनात आलेले परिवर्तन ह्या संदर्भात उल्लेखनीय आहे. साईबाबांचा केवळ परिचय होताच, दासगणूंच्या लेखणीस अध्यात्माचे दिव्य तेज चढले; भजन, कीर्तन, अभंग असले धार्मिक प्रकार दासगणू महाराजांच्या सुरेल गळ्यांत कायमचे अडकून राहिले.

- श्री. सुरेन्द्र देसाई,
मुंबई.

---

पाण्यात नाव राहिली तर काही हरकत नाही, परंतु नावेत मात्र पाणी शिरू देता कामा नये. एरवी ती बुडून जाईल. त्याचप्रमाणे साधक संसारात राहतो आहे, पण साधकाच्या मनात मात्र संसार न राहो म्हणजे झाले.

जसा ज्याचा भाव तसा त्याला लाभ. ज्याला ईश्वरच हवा असतो त्याला तो भेटतो. ज्याला ऐश्वर्याचीच आवड असते त्याला ऐश्वर्यच मिळते.

ईश्वर एक, त्याची अनंत नावे, अनंत भाव. ज्याला ज्या नावाने नी ज्या भावाने त्याला आळविणे आवडते त्याच भावाने नी नावाने आळविल्यास तो दर्शन देतो.

- श्रीरामकृष्ण-वाक्सुधा

---

# थोर साईभक्त कै. अण्णासाहेब दाभोलकर

- सौ. मिनाक्षी दाभोलकर,
मुंबई.

पूज्य श्री साईसत्‌चरितकार कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर उर्फ हेमाडपंत यांचे सुपुत्र डॉ. गजानन गोविंद दाभोलकर (एल्.सी.पी.एच्.) हे शुक्रवार, दिनांक -३-१९९० रोजी रात्रौ ८-१५ वा. वृद्धापकाळामुळे साईचरणी विलीन झाले. श्री साईबाबांना पाहिलेल्या नवरत्नांपैकी डॉ. अण्णासाहेब दाभोलकर हे एक होते.

डॉ. अण्णासाहेबांचा जन्म २३-९-१९०३ साली गुजराथमध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण बोरसाद येथे गुजराथी भाषेतून झाले. पुढे त्यांच्या वडिलांची १९१० मध्ये बांद्रे येथे बदली झाली. बांद्रा कोर्टात ते मॅजिस्ट्रेट होते.

ते सर्व कुटुंबियांसह बांद्रा येथे आले. त्यामुळे डॉ. अण्णासाहेब दाभोलकरांचे पुढील शिक्षण मुंबई मुक्कामी झाले. १९४० मध्ये एल्.सी.पी.एच्. ही डॉक्टरची पदवी संपादन केल्यावर त्यांनी सायन कोळीवाडा येथे स्वतःचा दवाखाना सुरु केला.

डॉ. अण्णासाहेबांचे वडील श्री साईबाबांचे परमभक्त असल्याने डॉक्टरांना पूज्य साईबाबांच्या मांडीवर बसण्याचे भाग्य लाभले. साईबाबांचे आशीर्वाद सदासर्वदा त्यांच्या पाठीशी असत.

त्यांची राहणी अत्यंत साधी, पण नीटनेटकी असायची. ते प्रेमळ व शांत स्वभावाचे होते. तसाच त्यांना एकांत अधिक पसंद असे. त्यांचा रंग गोरा, देहयष्टी उंच व दिसण्यात रूबाबदार होते. कुणावरही छाप पडेल असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. ते स्वतःची कामे स्वतःच करीत असत. जे काम वेळेवर करायला पाहिजे ते झालेच पाहिजे याबद्दल ते दक्ष असत. त्यांच्यात अनेक चांगले गुण होते. ते स्वतः नाटकात काम करीत, नाटक पहाण्याचीही त्यांना आवड होती, ते व्हायोलीनपण वाजवित असत.

इ.स. १९२९ मध्ये त्यांचे वडील (हेमाडपंत) साईचरणी विलीन झाल्यानंतर घरची सर्व जबाबदारी त्यांच्यावर पडली. श्री साईसत्‌चरितातील शेवटचा अध्याय त्यांनीच पूर्ण केला. श्री साईसत्‌चरिताचे पूर्ण हक्क त्यांनी शिर्डी संस्थानला अर्पण केले. आणि त्याच संस्थेचे सेक्रेटरी म्हणून १९२९ ते १९६४ या कालावधीत ३५ वर्षे त्यांनी संस्थानची सेवा केली. परमपूज्य श्री साईबाबांचे श्राद्धही करण्याचे भाग्य त्यांना लाभले. पंढरपूर येथे वारकरी बांधवांना लस टोचण्याचे काम त्यांनी केले. ह्या कामासाठी

सरकारतर्फे त्यांची निवड झाली होती. त्यांनी अनेकांना आर्थिक मदत केली, तसेच काहीजणांची लग्नकार्येही करून दिली. अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळत असल्याने १९६४ मध्ये शिर्डीतच त्यांना अर्धांगवायु झाला. परंतु कृपाळू श्री साईबाबांच्या आशीर्वादाने ते वर्षभरात बरे झाले. १९७४ पासून त्यांनी दवाखाना बंद ठेवला तो कायमचाच. त्यांच्या मुलांनी नंतर त्यांची सेवा व सांभाळ केला.

पूज्य साईबाबांच्या कृपेने त्यांना समाजात मानाचे स्थान मिळाले. अनेक साईमंदिरांना त्यांनी भेटी दिल्या. कलकत्ता, मद्रास, बंगलोर, नागपूर, इंदूर, बडोदा, बलसाड, गोवा इत्यादि ठिकाणी त्यांना आदराने बोलविण्यात आले आणि त्यांचा प्रेमपूर्वक सत्कार करण्यात आला. त्यांनीही मोठ्या हौसेने सर्वत्र जाऊन साईभक्तांच्या इच्छा पूर्ण केल्या. मुंबईतही अनेक साईमंदिरांना त्यांनी भेटी दिल्या. प्रतिवर्षी दाभोळ येथे आपल्या गावी पूर्णानंद स्वामींच्या पुण्यतिथीनिमित्ताने ते जात असत. प्रवासाचा त्यांनी कधीही कंटाळा केला नाही. आनंदी वृत्ती, खाण्यापिण्याचे पथ्य नसल्यामुळे ते कुठेही श्री साईबाबांच्या कामासाठी जात असत. सर्वजण त्यांच्या ह्या हौसेचे कौतुक करीत.

बुधवार, दिनांक २७-१२-१९८९ रोजी सकाळी ते घरात पडले आणि ते त्यांचे अखेरचे दुखणे ठरले. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांची ह्या आजारावरची पहिली आणि अखेरची शस्त्रक्रिया ठरली. वृद्धापकाळामुळे त्यांना अतिशय थकवा आला.

ॲनिमियाच्या परिस्थितीमुळे त्यांना श्वास घेणेही जमत नव्हते. त्यांना वाचविण्यासाठी सर्वांनी आटोकाट प्रयत्न केले. परंतु ईश्वरी संकेत, नियतीचा खेळ काही वेगळाच होता. अशाही अवस्थेत त्यांना पंढरपूर व शिर्डीची सारखी आठवण होत असे आणि ते म्हणतही असत की मला "पंढरपूरला घेऊन चला, मला शिर्डीला न्या. मी येण्यास तयार आहे." परमेश्वरावरील ही त्यांची दृढ भावना, भक्ती व विश्वास बघून त्यांना बघायला जे सज्जन येत असत, त्यांचे डोळे अश्रूंनी भरून येत. डॉ. अण्णासाहेब दाभोलकरांच्या चेहऱ्यावर अखेरच्या क्षणीही कसलीच चिंता दिसत नव्हती. कुठल्याही प्रकारची इच्छा मागे न ठेवता त्यांनी देह ठेवला. सुखासमाधानाने ते श्री साईचरणी विलीन झाले. त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांति लाभो, अशी मी श्री साईचरणी अंतःकरणपूर्वक प्रार्थना करते.

# नामस्मरण

आपल्या महाराष्ट्रात अनेक संत होवून गेले व अमृताशी पैजा जिंकणाऱ्या आमच्या मायमाऊली मराठीला त्यांनी आपल्या वाङ्मयाने समृद्ध केले. अमृताचे बोल बोलून त्यांनी भक्तांना श्रवणप्रिय बनविले. परमेश्वराचे नामचिंतन करून स्वत: भगवंत प्राप्ति करून घेतली. सर्वसामान्यांना प्रपंच करताना भगवंताशी सुसंवाद कसा साधावा याचे निरूपण केले. प्रपंच करताना परमार्थ कसा साधावा याचे मार्गदर्शन केले.

नाम म्हणजे भगवंताचे नांव. परमेश्वराचे नांव घेता घेता साधकाने स्वत:ला विसरून जायला हवे. नाम हे जीव व शिव यामधील दुवा आहे. सगुणभक्तीचा तो पाया आहे. परमेश्वराच्या पायापर्यंत घेवून जाणारी ती वाट आहे. भगवंताचे नाव स्वत: सिद्ध आहे. स्वत: निवडलेले नाम आणि त्याचा अविरत मनोभावे केलेला जप यामुळेही सुख समाधान प्राप्त होते. असे असले तरी सद्‌गुरुकडून घेतलेले नाम अधिक वैशिष्ट्यपूर्ण, अधिक श्रेष्ठ मानले जाते.

आपले मन अतिशय चंचल असते. क्षणात येथे तर क्षणात अनंतात भराऱ्या मारणारे. त्यामुळे त्याला गुंतवून ठेवण्यासाठी आपण आपल्या कानांनी नामस्मरण ऐकत राहावे. म्हणजे चित्त एकाग्र व्हायला मदत होईल. आपणांस नामाचा ध्यास लागेल अशी आपली कृती हवी. आपल्या मुखी ते सतत कसे राहील याकडे आपले लक्ष हवे. अर्थात त्यासाठी कष्टांची व मनोनिग्रहाची जोड हवी. सांसारिक व्यथांनी भरलेल्या मनाला लगाम घालावयास हवा. प्रथम प्रथम सांसारिक विवंचनाच्या आवर्तनात ते कुठल्या कुठे लुप्त होवून जाईल ते समजणारसुद्धा नाही. पण हळू हळू सवयीने त्याची गोडी वाटू लागेल. नामस्मरण केले नाही तर बेचैनी वाटू लागेल. एकदा का ते खोल रूतले की आपल्या श्वासोश्वासाइतके सहज सुलभ होवून जाईल, मुद्दाम घ्यावे लागणार नाही. साधकाची अवस्था 'राम हमारा जप करे हम बैठे आराम' अशी होवून जाईल.

भगवंत स्वत: अरूप आहे, निर्गुण आहे. म्हणून आपण जे रूप त्याला देतो तेच त्याचे रूप असते. कुठल्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते. देवळात पाहिलेली मूर्ती किंवा एखाद्या चित्रकाराने रंगविलेले परमेश्वराचे सगुणरूप आपल्या मनात ठसून राहते. तेच रूप हृदयामध्ये ठेवून तो सतत आपल्यासोबत आहे हे ध्यानात घेवून त्याचे नामस्मरण करावयास हवे.

प्रसिद्ध संत गोंदवलेकर महाराज म्हणतात—

"लोभ्याच्या मनात जसे वित्त।<br>
तसे साधकाचे नामात चित्त।

एवढे ज्याने केले काम।
त्याला नाही रामाचा वियोग।

तर संत तुकाराम म्हणतात,

नामसंकीर्तन साधन पैं सोपें।
जळतील पापें जन्मांतरिंची॥१॥
न लागती सायास जावे वनांतरा
सुखे येतो घरा नारायणा॥२॥
रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा।
मंत्र हा जपावा सर्वकाळ॥३॥

अशा प्रकारे संतांनी नामस्मरणाचे महत्त्व सांगितले आहे. ईश्वराकडे कोणत्याही सांसारिक गोष्टींची मागणी न करता सर्वांनी तुझ्या नामस्मरणातच आम्हाला दंग राहू दे! अशी देवाची प्रार्थना केली आहे. नामस्मरणाशिवाय आम्हाला काही नको सुचू दे! विठ्ठला! तुझी सावळी, मनोहर मूर्तीच आम्हाला दिसू दे! बाकी आम्हांस काही नको, अशी कळकळीची विनंती केली आहे.

संत एकनाथ महाराज म्हणत, "मी नामाचे अमृत सेवन केले व तृप्त झालो. म्हणून सर्वांना मुखाने नाम जपा असे सांगतो. नाम आकाशपाताळ व्यापून राहते. ते अविनाशी आहे."

अशा प्रकारे प्रपंचात राहून ईश्वरप्राप्तिचा मार्ग संतांनी दाखविला. म्हणून नामस्मरण हे संसारी माणसाला शांतीचा व समाधानाचा ठेवा देणारे आहे. या युगात शाश्वत सुख, समाधान देणारे आहे. हा भक्तीचा व्यापक व सोपा मार्ग आहे.

संसारात राहून त्याच्या नामाचे अनुसंधान असले पाहिजे. म्हणजे अडचणी, संकटे यांचे काही वाटेनासे होते. जे होते, जे घडते ते त्याची ईच्छा, असे म्हणून नेटाने नामस्मरण करावयास हवे. त्याला कशाचेही बंधन नाही. फक्त ते सतत कोणतीही आडकाठी आली तरी घेतले पाहिजे. ते घेण्यास किती सुलभ आहे हे सांगताना रामदासस्वामी म्हणतात,

न वेंचे कदा ग्रंथिंचे अर्थ काही
मुखे नाम उच्चारितां कष्ट नाही।
महाघोर संसारशत्रु जिणावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥

हेमाडपंतांनी लिहिलेल्या श्री साईसत्चरितावरून सुद्धा हेच दिसते की, साईबाबांनी 'शाम्या' माधवराव देशपांडे यांना नामस्मरणाचे महत्त्व ठसविले होते. हे खालील पंक्तीवरून दिसून येईल.

''नामापरिस सोपें आन। अंतशुद्धीस नाहीं साधन।
नाम जिव्हेचें भूषण। नाम पोषण परमार्था॥८८॥
नाम घ्यावया नलगे स्नान। नामासि नाहीं विधिविधान।
नामें सकळपाप निर्दळण। नाम पावन सर्वदा॥८९॥

अध्याय २७, श्री साईसत्‌चरित

- सौ. प्रविणा कांबळी,
मानद सहाय्यक कार्यकारी संपादिका

---

## ''श्री साईलीला'' सभासदांना निवेदन

* ''श्री साईलीला'' संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना ''श्री साईलीला''च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या ''श्री साईलीला'' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

* ''श्री साईलीला'' वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

* पत्यात बदल झाल्यास शिरडी कार्यालयाला त्वरित कळवावे. पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

* आपल्या पत्यात काही दुरूस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्या विषयी शिरडी कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

* ''श्री साईलीला'' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या शिरडी व मुंबई कार्यालयाकडे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो ''श्री साईबाबा संस्थान शिरडी'' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. ''संदेश के लिए स्थान'' आणि ''भेजनेवाले का नाम व पूरा पता'' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* मनिऑर्डर-पत्रावर नाव-पत्ता लिहिताना तो वाचता येईल, अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

## हितगुज

श्री साईलीला मासिकाचा मार्च १९९०चा अंक खूपच वाचनीय आहे. श्री साईलीला अंकात खूपच सुधारणा झाल्या आहेत यात शंकाच नाही.

- **श्री. व्ही. पी. इंगळे,** रिसोड.

आपला श्री साईलीला, मार्च १९९०चा अंक मिळाला. वाचून ज्ञानाने मन तृप्त झाले. अंकाची मांडणी व मुखपृष्ठावरील साईबाबा हृदयाचे मंदिर करून त्याच्यात ठेवावे इतके आकर्षक वाटले. श्री साईलीलारूपी अंक म्हणजे साईज्ञानाची पवित्र गंगाच वाटते.

(याच अर्थाचे यांचे पत्र एप्रिल १९९०च्या अंकाबद्दल आलेले आहे.)

- **श्री. रामदास ग. पगारे,** विसरवाडी, धुळे.

मार्च १९९०च्या अंकाची प्रगति चांगली आहे. अंकातील प्रत्येक लेख, अनुभव वाचनीय असतो. भक्तांना चांगले साहित्य वाचावयास मिळावे ही साईचरणी विनम्र प्रार्थना. मासिकाचा आकार मोठा करावा ही सूचना.

- **श्री. गुरुनाथ वि. पन्हाळकर,** कोल्हापूर.

श्री साईलीला मासिकाने आमचे मन वाचताच प्रसन्न होते. या मासिकांतील गोडी साखरेपेक्षा गोड आहे. मासिकाचा दर्जा निश्चितपणे उंचावला आहे. श्री साईलीला मासिक उच्च स्थानावर जाईल अशी अपेक्षा आहे.

- **श्री. बी. जी. यरमलवाड,** येवती, नांदेड.

मी श्री साईलीलाची वाचक आहे. अंक कधी येतो याची वाट पहात असते. माझे वय ७९ आहे. मला श्री साईंचे प्रत्यक्ष दर्शन घडले आहे. त्यावेळी मी तीन वर्षांची होते.

- **श्रीमती मनोरमा पी. दीक्षित,** मुंबई.

श्री साईलीलाचा 'रामनवमी' विशेषांक वाचला. श्री साईलीला ही आम्हास एक पर्वणीच वाटते व प्रसादही वाटतो. श्री साई सत्चरित ग्रंथातील बाबांचे उपदेश, तत्त्वज्ञान सरळ व सोप्या शब्दात उकलण्याचे उत्तम कार्य आहे. आम्ही श्री साईलीलाच्या प्रतीक्षेत नेहमीच असतो.

- **श्री. गंगाधर गो. गुंगेवार,** नायगाव.

---